सोलापूर
Solapur Tarun Bharat
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ९ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १३९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

भारत २०५० पर्यंत उच्च उत्पन्न असलेले राष्ट्र होईल : सदस्य, नीती आयोग

शिक्षण आणि कौशल्य यामधील तफावत दूर केली पाहिजे : डॉ अरविंद विरमानी

मुंबई, ८ ऑगस्ट : भारत २०३० च्या दशकाच्या सुरुवातीला उच्च मध्यम-उत्पन्न असलेले राष्ट्र आणि २०५० पर्यंत उच्च उत्पन्न असलेले राष्ट्र बनेल, असे मत नीती आयोगाचे सदस्य डॉ. अरविंद विरमानी यांनी व्यक्त केले. सीआयआय अर्थात भारतीय उद्योग महासंघाने मुंबईत आज (८ ऑगस्ट) पाचव्या जागतिक व्यापार परिदृश्य परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेची संकल्पना 'अडथळ्यांवर मार्ग : लवचिकता, शाश्वतता आणि नवोन्मेष' अशी होती. सध्या जागतिक अभूतपूर्व आव्हानांना सामोरा जात असून प्रमुख संबधितांमध्ये संवादाला चालना देणे,हा या परिषदेचा उद्देश होता.

डॉ. विरमानी यांनी आपल्या बीजभाषणात सांगितले, जनसांख्यिकी लाभ, सेवांचे विलगीकरण, विखंडीकरण आणि निर्यातीतील मक्तेदारी संपुष्टात आणणे, यामुळे व्यापाराला चालना मिळून वर्ष २०३० पर्यंत उच्च मध्यम उत्पन्नाच्या देशात भारताला स्थान मिळण्यात साहाय्य मिळेल. जागतिक व्यापारातील अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर भारताला असलेल्या प्रगतीच्या संधींबद्दल त्यांनी उहापोह केला. जागतिक वाढ परिदृश्यात झालेल्या लक्षणीय बदलाकडे त्यांनी लक्ष वेधले. प्रत्येक राज्यामध्ये गुंतवणूकदारांचा विश्वास अधिक वाढीला लागेल असे 'अँकर इन्वेस्टर्स' मिळवल्याने थेट परदेशी गुंतवणुकीला चालना मिळेल. डॉ.विरमानी यांनी भारतासंबंधी अनेक स्थूल-आर्थिक निर्देशकांवर विचार मांडले. सरासरी ५.४% वाढीचा अंदाज त्यांनी व्यक्त केला. या उत्पन्न पातळीला अनुरूप मानकांच्या पूर्ततेसाठी पेयजल,स्वच्छता आणि सांडपाणी व्यवस्थापनासह शहरी पायाभूत सुविधा अद्ययावत करण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

भारतातील कामकरी लोकसंख्येचे गुणोत्तर वाढत आहे आणि कर्मचाऱ्यांची संख्या लोकसंख्येच्या वाढीच्या दरापेक्षा वेगाने वाढत आहे,असे डॉ. विरमानी यांनी रोजगाराबद्दल बोलताना सांगितले.शिक्षण आणि कौशल्य यातील तफावत तातडीने दूर करण्याची गरज असून याकडे लक्ष द्यायला हवे,असे त्यांनी सांगितले.

रोजगार निर्मिती आणि कौशल्य विकास,'निपुण- वाचन आणि संख्याज्ञान यात नैपुण्य' आणि 'दीक्षा -ज्ञान आदानप्रदानासाठी डिजिटल पायाभूत सुविधा योजना' या उपक्रमांशी जोडलेले असून अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या कौशल्यविकासावर सरकार मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित करत आहे,असे डॉ. विरमानी यांनी सांगितले. मात्र कौशल्य विकासातली तफावत दूर करण्यासाठी आणि यशस्वी फलित साध्य करण्यासाठी सरकारच्या उपक्रमांना खासगी क्षेत्र आणि बिगर सरकारी संघटनांच्या सहभागाची जोड मिळणे आवश्यक असल्यावर त्यांनी भर दिला.

डॉ. विरमानी यांनी मध्यम ते दीर्घकालीन वाढ टिकवून ठेवण्याचे दोन प्राथमिक मार्ग सांगितले. प्रथम, त्यांनी सातत्यपूर्ण धोरणात्मक सुधारणा आणि नवोन्मेषाच्या महत्त्वावर भर दिला. दुसरे, त्यांनी लक्ष्यित कार्यक्रम आणि प्रकल्पांचे महत्त्व,विशेषत:अर्थसंकल्पात नमूद कौशल्य विकासाला प्रोत्साहन देणाऱ्या तरतुदी त्यांनी अधोरेखित केल्या.कर आणि व्यवसाय सुलभता याच्याशी संबंधित यासह विविध पुढाकार ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ.विरमानी यांनी आपल्या भाषणात, महामारी आणि अलीकडील अडथळ्यांचा परिणाम विषद केला. या अडथळ्यांनी गेल्या पाच वर्षांत वाढीचा दर कमी केला, असे त्यांनी नमूद केले. मात्र सुधारणा आणि अर्थव्यवस्थेचा कायाकल्प या मार्गावर देश कायम राहिल्यास सफलता निश्चित असल्याचा दावा त्यांनी केला.

सीआयआयच्या पश्चिम क्षेत्र अध्यक्ष स्वाती साळगावकर यांनी भारताच्या जागतिक व्यापाराच्या दृष्टिकोनातून देशाचे पश्चिम क्षेत्र कसे महत्त्वपूर्ण योगदान देते, याचा उल्लेख केला. महाराष्ट्र, गोवा, गुजरात आणि मध्य प्रदेशचा भारताच्या एकूण परदेशी थेट गुंतवणूक ओघात ४७ टक्के वाटा आहे आणि भारताच्या एकूण निर्यातीत ५० टक्के वाटा आहे, असे त्यांनी सांगितले.

वक्फ कायदा १९९५ सुधारणा विधेयक संसदेत सादर

नवी दिल्ली, ०८ ऑगस्ट : संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी आज, गुरुवारी वक्फ कायदा १९९५ मध्ये सुधारणा करण्यासाठी वक्फ (सुधारणा) विधेयक २०२४ लोकसभेत सादर केले आहे. गेल्या काही दिवसांपासून देशभरात या सुधारणा विधेयकावर चर्चा सुरू आहे. जेडीयू आणि शिवसेनेने या विधेयकाला पाठिंबा दर्शवला असून काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि एआयएमआयएम यांनी विरोध दर्शवला आहे. संयुक्त जनता दलाचे (जेडीयू) नेते आणि केंद्रीय मंत्री लल्लन सिंह यांनी संसदेत वक्फ विधेयकाचे समर्थन केले आहे.

हे विधेयक मुस्लिमविरोधी नसल्याचे लल्लन यांनी म्हटले आहे. विरोधक मंदिराबद्दल बोलत आहेत, इथे मंदिराची चर्चा कुठून आली ? मूळात कोणतीही संस्था निरंकुश झाली की, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि पारदर्शकतेसाठी सरकार कायदे करत असते. हा सरकारचा हक्क आहे. हे विधेयक पारदर्शकतेसाठी आहे.

बांगलादेशातील हिंदूच्या सुरक्षेला महत्व द्या : संजय आप्पा बारगजे

छत्रपती संभाजीनगर - बांगलादेश अराजकता आणि हिंसाचाराच्या विळख्यात सापडला आहे. निवडून आलेल्या पंतप्रधानांच्या राजीनाम्यानंतर आणि त्यांच्या निघून जाण्यानंतर, बांगलादेशात जिहादी वृत्तीच्या अतिरेक्यांनी अल्पसंख्य असलेल्या हिंदू समाजाच्या माता भगिनीवर अत्याचार सुरू केले असून मोठ्या प्रमाणात हिंदूच्या हत्या होत आहेत हिंदूंची घरे व्यवसायाची ठिकाणे मंदिरे लुटली जात असून त्यानंतर आग लावून नष्ट केले जात आहेत बांगलादेशातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कोसळली असल्याचे विश्व हिंदू परिषदेकडून देवगिरी प्रांताध्यक्ष संजय आप्पा बारगजे यांनी सांगितले.

पत्रकारांशी बोलताना बारगजे म्हणाले की, तस्कर जिहादी घटकांनी आंदोलनात प्रवेश केला असून हिंदू अल्पसंख्यांकांना बांगलादेश सोडण्याचे आदेश दिले जात आहेत. बांगलादेशातील एकही जिल्हा राहिला नाही जो त्यांच्या हिंसाचार आणि दहशतीचा बळी ठरलेला नाही. बांगलादेशातील नियमित जिहादी अत्याचारांमुळे हिंदूंचे विभाजनाच्या वेळी असलेले ३२% प्रमाण आता ८% पेक्षा खाली आले आहे. शिल्लक असलेल्या हिंदूंनाही इथून संपवून टाकण्याचा कट अतिरेक्यांनी रचला आहे

विश्व हिंदू परिषदेने सांगितले की बांगलादेशातील हिंदूंची घरे व्यावसादिक ठिकाणे कार्यालय धार्मिक स्थाने महिला, लहान मुले त्यांचे पूजा स्थाने सुरक्षित नाहीत. नह केली जात आहेत तेथे असलेल्या पीडित हिंदू अल्पसंख्यांकांची स्थिती अतिशय वाईट होत आहे हे स्पष्ट आहे. ही परिस्थिती आत चिंताजनक आहे. अल्पसंख्यांकांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी जागतिक समुदायाने प्रभावी कारवाई करणे हे कर्तव्य आहे.

भारताने पारंपारिकपणे जगभरातील पिडीत समुदायांना मदत केली आहे. विश्व हिंदू परिषदेने भारत सरकारला बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांकांच्या सुरक्षेसाठी योग्य ते पाऊल उचलण्याची विनंती केली आहे

बिडकीन येथे तीन दुचाकींचा अपघात; एक ठार

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. ७ ऑगस्ट : पैठण तालुक्यातील बिडकीन जवळ असलेल्या फारोळा तांडा येथे दुचाकी क्रमांक एम एच २० एफ सी ०७०१, एम एच २० डी बी ५७७०आणि एम एच २० ए झेड ९२३५ या तीन दुचाकी दि.६ मंगळवार रोजी रात्री दहा वाजे दरम्यान एकमेकांना धडकल्याने या अपघातात बिडकीन येथील शामेर शब्बीर पठाण वय ३० रा.पठाणवाडा बिडकीन ता. पैठण या तरूणाला डोक्याला गंभीर जखम झाल्याने त्याला बिडकीन येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणिता मात्रे यांनी तपासून मयत घोषित केले शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले ,शामेर हा दुचाकी क्रमांक एम एच २० ए झेड ९२३५ वरून जात होता तो व्यवसायाने हायवा चालक होता. दोन्ही दुचाकी स्वार घटनास्थळावरून दुचाकी सोडून पळून गेल्याचे समजते पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे बिट जमादार दिलीप साळवे करीत आहे.

सुमीतएसएसजी सह प्रगत एमईएमएस १०८ रुग्णवाहिका प्रकल्प

छत्रपती संभाजीनगर : सुमित फॅसिलिटीज लिमिटेड इंडिया, एसएसजी ट्रान्सपोर्ट सॅनिटेरियो एस.एल, स्पेन आणि याआधीचे सेवा पुरवठादार बिव्हीजी इंडिया लिमिटेड, ह्याच्या मार्फत नवीन 'महाराष्ट्र इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेस' (एमईएमएस) १०८ रुग्णवाहिका प्रकल्प महाराष्ट्र राज्यात अंमलात आणणार आहेत. हा प्रकल्प ॲडव्हांस्ड ग्लोबल स्टँडर्डच्या उपयोगाद्वारे अत्याधुनिक टेकनॉलॉजिचा वापर करून भारतातील आपत्कालीन वैद्यकीय सेवेमध्ये आमूलाग्र बदल करण्यासाठी सज्ज आहे. हा १० वर्षाचा प्रकल्प सेवा कार्यक्षमता, आणि परिणामकारकता यांना मोठ्या स्तरावर चालना देणारा आहे. हा प्रकल्प अत्याधूनिक टेक्नॉलॉजी वापरून महाराष्ट्रातील आरोग्यसेवा क्षेत्रात व्यापक प्रमाणात सुधारणा घडवून आणेल तसेच एक नवीन ऑपरेशनल मॉडेल पुढे येईल असे अपेक्षित आहे. सध्या, भारतभरातील रुग्णवाहिका सेवा प्रामुख्याने पेशंट ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस म्हणून कार्यरत आहे. महाराष्ट्र सरकारने कल्पना केलेल्या या नवीन प्रकल्पाचे उद्दीष्ट रुग्णाच्या आपत्कालीन परिस्थितीच्या गंभीर गोल्डन अवर्समध्ये विशेष वैद्यकीय उपकरणांचा वापर करून जीव वाचविणे आहे.

टायटन कंपनी लिमिटेडच्या हेलियसचे पदार्पण

अहमदनगर- घड्याळे आणि वेयरेबल्सची रिटेल विक्री करणारा आघाडीचा भारतीय ब्रँड, टायटन कंपनी लिमिटेडने अहमदनगर मध्ये पहिले हेलियस स्टोर आणि नूतनीकरण करण्यात आलेले टायटन वर्ल्ड स्टोर ५ ऑगस्ट रोजी सुरु करून, रिटेल विस्तारामध्ये महत्त्वाकांक्षी पाऊल उचलल्याची घोषणा केली आहे. महाराष्ट्रामध्ये हेलियस आणि टायटन वर्ल्डच्या धोरणात्मक विस्तारामध्ये ही दोन स्टोर्स एक लक्षणीय टप्पा आहेत. ८५० चौरस फुटांचे हे नवीन स्टोर सावेडीमध्ये नगर मनमाड रोडवर मीरा हाईट्स मध्ये आहे. डेप्युटी ग्रुप मॅनेजर, रिटेलिंग - वॉचेस श्री गौरव बोरा यांनी या स्टोरचे उदघाटन केले.

वेगाने होत असलेले शहरीकरण, विकास आणि लक्झरी उत्पादनांची वाढती मागणी यामुळे राज्यामध्ये अहमदनगरला लक्षणीय महत्त्व मिळत आहे.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२३/२०२४ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २०-०२-२०२४

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, सिता विष्णु मापारी यांनी मोहल्ला वार्ड क्र ०७ स.नं. ----- मधील घर/प्लॉट ६६६ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.
पूर्व : रस्ता पश्चिम : शांताराम गणपत चौधरी यांचे घर
दक्षिण : रमेश कौतिक पाटील यांचे घर उत्तर : अशोक कृष्णा काळे यांची जागा.
आकार : पूर्व पश्चिम ५७२ दक्षिणोत्तर.....
वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२३/२०२४ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २४-०७-२०२४

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, जयेश भागवत पाटील यांनी -- सोयगांव स.नं. ----- मधील घर/ प्लॉट -- त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.
पूर्व : आज रोजी इश्वर ओंकार क्षीरसागर यांना विक्री केलेली जागा बखळ जागा,
पश्चिम : प्रल्हाद चौधरी यांची बळख जागा, दक्षिण : रस्ता उत्तर : गट नं. २०८
आकार : पूर्व पश्चिम ३६ चौ.मी. = ३८७.३५ दक्षिणोत्तर.....
वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२३/२०२४ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २९-०७-२०२४

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, ईश्वर ओंकार क्षीरसागर यांनी मोहल्ला वार्ड क्र. १५ स.नं. ----- मधील घर/प्लॉट १२२७ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.
पूर्व : आज रोजी शंकर पंढरी इंदकर यांना विक्री केलेली बखर जागा
पश्चिम : आज रोजी जयेश भागवत पाटील यांना विक्री केलेली जागा. दक्षिण : रस्ता उत्तर : गट नं. २०८
आकार : पूर्व पश्चिम १०२८- ७०२ दक्षिणोत्तर.....
वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२३/२०२४ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २९-०७-२०२४

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, शंकर पंढरी इंदरकर यांनी मोहल्ला वार्ड क्र. १५ स.नं. ----- मधील घर/प्लॉट १२२७ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.
पूर्व : सुनिल विरचंद जैन यांची बखळ जागा
पश्चिम : आज रोजी ईश्वर ओंकार क्षीरसागर यांना विक्री केली. दक्षिण : रस्ता उत्तर : गट नं. २६८
आकार : पूर्व पश्चिम १०४०.०८ दक्षिणोत्तर.....
वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२३/२०२४ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ०८-०८-२०२४

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, विष्णु विनायक मापारी यांनी वार्ड क्र ०७ सोयगांव स.नं. ----- मधील घर क्र. ६६५ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.
पूर्व : रस्ता पश्चिम : अरुण आनंदा चौधरी यांचे घर
दक्षिण : शकुंतलाबाई विष्णुजी काळे यांची जागा उत्तर : दिनकर भास्कर पिंगाळकर यांचे घर
आकार : पूर्व पश्चिम ७१६ चौ. फुट. दक्षिणोत्तर.....
वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव



जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क.स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनर

सिव्हिल एम.ए. क्र. ३०३ /२०२४

अर्जदार : १) द्रोपदावाई भ्र. कचरु ढोले, बय ७८ वर्षे, धंदा शेती, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) विजय पि. कचरु ढोले, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) राजेंद्र पि. कचरु ढोले, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. टेंभापुरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) भारती भ्र. निवृत्ती चौरे, बय ५४ वर्षे, धंदा घरकाम रा गजानन कॉलनी गारखेडा परिसर छत्रपती संभाजीनगर ५) कावेरी भ्र. दिनकर मोरे, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम रा. वडगाव कोल्हाटी, बजाजनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए. एस. इंगळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.४ व ५ ह्या त्यांच्या वहिणी आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.१ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे पिता नामे कचरु वापुराव ढोले हे मौजे टेंभापुरी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २३/०५/२०२२ रोजी मौजे टेंभापुरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत कचरु वापुराव ढोले यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ हे मुले व अर्जदार क्र.४ व ५ ह्या मुली असे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्धीनंतरचा आक्षेप- उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ८/८ / २०२४ रोजी दिले.

वरीष्ठ कनिष्ठ सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायधिश साहेब क-स्तर न्यायालय छ. संभाजीनगर ता.जि.छ. संभाजीनगर

सिव्हील एम.ए.नं. ३२८/२०२४

अर्जदार : १. अनिल बाजीराव म्हस्के वय. ५० वर्ष धंदा. नोकरी रा. भेंडाळा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर २. संगीता बाबासाहेब चापे वय ४६ वर्ष धंदा. शेती रा. बाबारगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. सुनिल बाजीराव म्हस्के वय. ४५ वर्ष धंदा. शेती रा. भेंडाळा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

- : विरूद्ध :-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण - कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.आर.एम. भालेराव यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, असे की, अर्जदार नं. १ ते ३ यांची आई नामे चंद्रभागाबाई बाजीराव म्हस्के हे दि. ३०/०६/२०२४ रोजी मौजे भेंडाळा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत चंद्रभागाबाई बाजीराव म्हस्के यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत चंद्रभागाबाई बाजीराव म्हस्के यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत चंद्रभागाबाई बाजीराव म्हस्के यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत चंद्रभागाबाई बाजीराव म्हस्के यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दी नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहायक अधिकक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.

दि.कि.अर्ज क. ३१७/२०२४

अर्जदार : १. मुक्ताबाई भ्र. हरिभाउ मुळे, वय ८८ वर्षे, गृहीणी, रा. सावखेडा, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, २. सुदामराव पि. हरिभाउ मुळे, वय ५७ वर्ष, धंदा शेती, रा. साईनिवास, गारखेडा परीसर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर, ३. अलका भ्र. सुदाम शेंगुळे, वय ५४ वर्ष, धंदा गृहीणी, रा. साईनिवास, सिडको, वाळूज महानगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर ४. पदमा भ्र. कडुबाळ मुळे, वय ६५ वर्ष, धंदा घरकाम, ५. रेखा भ्र. भगवान दिवटे, वय ४० रा. गुरुदत्तनगर, गारखेडा परीसर, छत्रपती संभाजीनगर, ६. शितल पि. कडुबाळ मुळे, वय ३७ वर्ष, धंदा शि, ७. सविता पि. कडुबाळ मुळे, वय ३२ वर्ष, धंदा शिक्षण, ४. गणेश वि. कदुबळ मुळे द ३० वर्ष, धंदा शिक्षण, अर्जदार क. ४, ६ ते ८ रा. जयसिंगनगर, ता. गंगा छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस. के.नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ व ३ यांची आई असुन अर्जदार क. १ चा दुसरा मुलगा कडुबाळ पि. हरिभाउ मुळे हे दिनांक ३१/१२/२०१७ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क. ४ ही कडुबाळ यांची पत्नी असुन अर्जदार क. ५ ते ८ हे त्यांचे मुले व मुली आहेत. अर्जदार क. १ ते पती व अर्जदार क. २ व ३ चे वडील नामे हरिभाउ पि. गणपत मुळे, रा. सावखेडा, ता. गंगापुर हे दिनांक १९/०१/२०२३ रोजी मौजे सावखेडा, ता. गंगापुर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयताचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता है जाहीर प्रगटन माझया सही व शिक्याने आज दिनांक ०५/०८/२०२४ रोजी दिले.

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

जाहीर प्रगटन

मा. वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गंगापुर यांचे न्यायालयात

सिव्हील एम.ए. क्रं २५२/२०२४
पुढील तारीख : ९/९/२०२४

अर्जदारः १. अर्जुनसिंग पि. सुखलाल जारवाल, वयः ३० वर्षे, धंदाः काही नाही रा. नागोण्याची वाडी, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद.

२. करण पि. सुखलाल जारवाल, वयः २८ वर्षे, धंदाः शिक्षण रा. वरील प्रमाणे ३. देवकाबाई भ्र. सुखलाल जारवाल वयः ५५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. वरील प्रमाणे. ४. पुतळाबाई भ्र. दिपलाल जारवाल, वयः ९१ वर्षे, धंदाः काही नाही, रा. टाकळीवाडी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

विषय- लिगल हेअरशिप सर्टीफिकेट (वारस प्रमाणपत्र) मिळणेबाबत.

ज्याआर्थी वरील अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. ए. एस. जावळे रा. औरंगाबाद यांच्या मार्फत अर्ज दाखल केला की, अर्जदार क्रं १ व २ यांचे वडिल व अर्जदार नं ३ यांचे पती व अर्जदार क्रं ४ यांचा मुलगा नामे सुखलाल पि. जारवाल हे दिनांक २९.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. सदरील मयतांच्या पश्चात या प्रकरणातील वरील अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयतास ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

मयत सुखलाल पि. जारवाल हे महाराष्ट्र पोलिस दलामध्ये नाईक या पदावर कायमस्वरुपी नोकरीस होते. तेंव्हा मयत यांचे जागेवर अर्जदार क्रं १ यांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी अर्जदार क्रं १ यांचे नावाने वारस प्रमाणपत्र व लिगल हेअरशिप सटीफिकेट देणेबाबत अर्जदार नं २ ते ४ यांनी विनंती केली आहे. तेंव्हा वरील अनुकंपा तत्वावर नौकरी अर्जदार नं १ यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत अर्जदार क्रं २ ते ४ यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही. या करता मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कायदेशिर वारस प्रमाणपत्र देण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदार क्रं १ यांचे नावे लिगल हेअरशिप सर्टीफिकेट देण्याबाबत कोणाचा उजर व आक्षेप असेल तर त्यांनी आपला उजरवआक्षेप सदरील जाहिर प्रगटन' प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत मुळ कागदपत्रासह लेखी स्वरुपात न्यायालयात नोंदवावा, मुदतीत आक्षेपव उजर न आल्यास अर्जदार क्रं १ यांचे नावे वारस प्रमाणपत्रव लिगल हेअरशिप सर्टीफिकेट देण्याचे आदेशीत करण्यात येईल व मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही यांची नोद घ्यावी.

रोजी माझा सहीनिशी व आज दिनांक ३१/०७/२०२४ रोजी माझा व न्यायालयाचा शिक्यानिशी दिले.

क. लिपीक न्यायालय अधिक्षक
सह दिवाणी न्यायलय, क. स्तर गंगापूर

जाहीर प्रगटण

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

कि.वि.अर्ज क्र.३/८/२०२४

अर्जदार : १) शारदाबाई भ्र. सुधाकर भुजवळ, वय ७३ वर्षे, धंदा घरकाम रा. लासुर स्टेशन ता. गंगापुर ह.मु. देवगाव रंगारी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर २) सुधीर सुधाकर भुजबळ, वय ४६ वर्षे, धंदा व्यापार रा. लासुर स्टेशन ता. गंगापुर इ.मु. देवगाव रंगारी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर ३) स्मिता भ्र. प्रविण डांगरे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम रा. सिरजगाव ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर ४) संगिता भ्र. कैलास शिरपुरी वय ५० वर्षे धंदा घरकाम रा. अजय गॅस एजन्सी मागे, शिवाजीनगर दिंडोरी जि. नाशिक.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत. उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.३ व ४ ह्या आपसांत नात्याने सख्या बहिणी असुन अर्जदार क्र.२ हा त्यांचा भाऊ आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे पिता नामे सुधाकर पंडीतराव भुजबळ हे मुळचे लासुर स्टेशन ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते कामानिमीत्त देवगाव रंगारी ता. कन्नड येथे राहण्यास गेले होते व ते तेथेच दिनांक २६/०६/२०१४ रोजी मयत झालेले आहे. मयत सुधाकर पंडीतराव भुजबळ यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत सुधाकर पंडीतराव भुजबळ यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. मयत सुधाकर पंडीतराव भुजबळ यांचे नावे मौजे अनंतपुर/ हसुल ता. गंगापुर येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय सावंगी (लासुर स्टेशन) ता. गंगापुर येथे ग्रामपंचायत मिळकत नं. १३३७/३ क्षेत्रफळ लांबी ४० बाय रुंदी २४ म्हणजेच ९६० चौ. फुट क्षेत्रफळाची सहान जागा आहे. सदर मिळकत नावावर करणे कामी अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्धीनंतरचा आक्षेप - उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक / /२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

जाहीर प्रगटण

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

कि.दि.अर्ज क्र. २७७/२०२४

अर्जदार : १) सॅन्ड्रा उर्फ सँडा भ्र. विल्यम खंडागळे वय ५९ वर्षे, धंदा गृहिणी रा. न्यु स्नेहनगर सोसायटी, मार्केर्ट यार्ड, लास्ट बस स्टॉप जवळ, गुलटेकडी पुणे. २) वेसली पि. विल्यम खंडागळे वय ३१ वर्षे धंदा नौकरी रा. न्यु स्नेहनगर सोसायटी, मार्केर्ट यार्ड, लास्ट बस स्टॉप जवळ, गुलटेकडी पुणे. ३) वॉल्टर पि. विल्यम खंडागळे वय २५ वर्षे धंदा शिक्षण रा. न्यु स्नेहनगर सोसायटी, मार्केर्ट यार्ड, लास्ट बस स्टॉप जवळ, गुलटेकडी पुणे. ४) वेनिला पि. विल्यम खंडागळे, वय ३४ वर्षे, धंदा नौकरी रा. न्यु स्नेहनगर सोसायटी, मार्केर्ट यार्ड, लास्ट बस स्टॉप जवळ, गुलटेकडी पुणे.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम. व्ही. कसाने यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.३ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची बहिण आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे विल्यम बाबुराव खंडागळे हे मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते नौकरी निमीत्त पुणे येथे राहण्यास गेले होते व ते तेथेच दिनांक २३/०६/२०२२ रोजी मयत झाले आहे. मयत विल्यम बाबुराव खंडागळे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारस असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्धीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक / /२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायधिश साहेब क-स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

सिव्हील एम.ए.नं. ३१६/२०२४
पु. ता. १०/०९/२००४

अर्जदार : शकुंतलाबाई अशोक सूकासे वय ५६ वर्ष धंदा. शेती रा. हरसुली ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री. डि. ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा नामे संभाजी अशोक सूकासे हा दि. १३/०७/२०२४ रोजी मौजे हरसुली, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. अर्जदार ही मयत संभाजी अशोक सूकासे यांची कायदेशीर वारस असून, अर्जदार हिच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत संभाजी अशोक सूकासे हे श्रीराम फायनान्स येथे कार्यरत होते व अर्जदारांना शासकीय योजनांचा व विम्याचा लाभ मिळण्यासाठी मयत संभाजी अशोक सुकासे यांचे वारस प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, गयत संभाजी अशोक सूकासे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत संभाजी अशोक सूकासे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक संहयिक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.

दि.कि.अर्ज क. ३२७/२०२४

अर्जदार : १. चंद्रभागाबाई भ्र. सर्जेराव निकम, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम रा. सावंगी, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, २. आण्णासाहेब पि. सर्जेराव निकम, वय ४९ वर्षे, धंदा शेती रा. वरील प्रमाणे.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस. के. नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ची आई असुन अर्जदार क. १ ते पती व अर्जदार क. २ चे वडील नामे सर्जेराव पि. अमृतराव निकम, हे दिनांक १६/०३/२०२१ रोजी मौजे सावंगी, ता. गंगापुर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयताचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

आठवडी बाजारात मुरूम टाकण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
तेर, दि.८ ऑगस्ट -

धाराशिव तालुक्यातील तेर येथील आठवडी बाजारात मुरूम टाकण्याची मागणी नागरिकांनी ग्रामपंचायतकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तेर येथील आठवडी बाजारात अनेक ठिकाणी पावसामुळे चिखल होत असून त्याचा बाजारात जाणाऱ्या नागरिकांस त्रास होत असून आठवडी बाजारात ग्रामपंचायत यांनी लवकरात लवकर मुरूम टाकण्यात यावा अन्यथा पुढील आठवड्यात आठवडी बाजारात ठेकेदारास कर वसुली करू दिली जाणार नाही, असा इशारा नागरीकांनी तेर ग्रामपंचायतला निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनावर सचिन देवकते, शिवाजी पडूळकर, अभिजित पडूळकर, रमाकांत लकडे, संजय कोळेकर यांच्या सह्या आहेत.

फक्त नमस्कार नको... काम पाहिजे... जनतेला आता विकास पाहिजे

पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्याकडून परंडा विधानसभा मतदारसंघात प्रचाराला सुरुवात....

तभा वृत्तसेवा / आप्पासाहेब शिंदे
परंडा, दि.८ ऑगस्ट -

आता लवकरच होणाऱ्या आगामी विधानसभेच्या निवडणुका अतिशय रंगतदार होणार असून भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा म हाराष्ट्राचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्राध्यापक डॉ. तानाजीराव सावंत यांनी विकास कामाच्या जोरावर परंडा मतदारसंघात फक्त नमस्कार नको काम पाहिजे जनतेला आता विकास पाहिजे असे म्हणत गेल्या पंचवार्षिकला केलेल्या बाळासाहेब ठाकरे शिवजलक्रांतीच्या विकास कामांचा लेखाजोखा मांडत वाहनावर स्क्रीन पडदा लावून मतदार संघात जोरदार प्रचाराला सुरुवात केल्याचे दि.८ ऑगस्ट रोजी दिसून आले.

फक्त नमस्कार नको काम पाहिजे जनतेला आता विकास पाहिजे, असे म्हणत विरोधकावर जोरदार टीका केल्याचे दिसून आले आहे.

तर पालकमंत्री डॉ. सावंत यांनी परंडा मतदारसंघाच्या विकास कामासाठी हजारो कोटींचा निधी शासन दरबारी मंजूर केला आहे. याच निधीच्या माध्यमातून परंडा मतदारसंघात विविध विकास कामांना सुरुवात ही झाली असून काही कामे पूर्णत्वाकडे असल्याचे स्क्रीनच्या माध्यम ातून जनतेला दाखवण्याचे काम सावंत यांच्याकडून सुरू झाले असून शिवसेनेचा हा विकास रथ परंडा म तदारसंघात जनतेपर्यंत जाऊन पोहोचला आहे.

याला जनतेमधून चांगला प्रतिसाद मिळत असून निवडणुका जाहीर होण्याच्या

अगोदरच प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी प्रचाराला जोरदार सुरुवात केली आहे.

▶▶संक्षिप्त वृत्त...

श्री राजा शिवछत्रपती क्रिकेट क्लबच्या वतीने वृक्षारोपण

तुळजापूर, दि.८ ऑगस्ट -

तुळजापूर येथील श्री राजा शिवछत्रपती क्रिकेट क्लबतर्फे युवा उद्योजक राहुल भोसले यांच्या हस्ते डोंगरा परिसरात १०० वृक्षारोपन करण्यात आले. येथील नळदुर्ग रोड परिसरातील हेलिपँडच्या मागील डोंगरावर जवळपास १०० लावली. राजा शिवछत्रपती क्रिकेट क्लबचे विपीन शिंदे, सचिन शिंदे, नितीन सुर्यवंशी, सुदर्शन वाघमारे, बबलु सरवदे, ऋषिकेश साळुंके सह पदाधिकारी सदस्य सहभागी झाले होते.

पाथर्डी शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

कळंब, दि.८ ऑगस्ट -

वृंदावन फाउंडेशन पुणे व संत ज्ञानेश्वर महाराज बालकाश्रम कळंब यांच्या वतीने तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे चित्रकला किट व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष हभप. महादेव महाराज आडसुळ व प्रमुख पाहुणे माजी नगरसेवक सतिश टोणगे, प्राचार्य सतिश मातने, बाळासाहेब कथले, चेतन कात्रे, विलास मुळीक, संदिप कोकाटे, हभप. पिंगळे महाराज, बंडु ताटे, यश सुराणा, सरपंच नानासाहेब पिंगळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा अंजली जाधव, पोलिस पाटील बालाजी चिंचकर, जगदंब प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंडित देशमुख, मयुर पिंगळे, मनोज पिंगळे इत्यादी उपस्थित होते.

नागपंचमीनिमित्त विद्यार्थींना सौदर्य साहित्यांचे वाटप

नळदुर्ग, दि.८ ऑगस्ट -

चैतन्य मुक बधिर शाळेतील विद्यार्थीनीना नागपंचमी सणानिमित्त नळदुर्गचे माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी सौदर्य प्रसादन साहित्याचे वाटप केले आहे त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातुन स्वागत होत आहे. माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या वतीने सालाबादाप्रम ाणे याही वर्षी चैतन्य मुक बधिर शाळेतील विद्यार्थीनीना नागपंचमी सणानिमित्त सौदर्यप्रसादनाचे साहित्य वाटप करण्यात आले. मुक बधिर शाळेतील विद्यार्थ्यांशी त्यांचे एक प्रेमळ संबंध निर्माण झाले आहेत. विनायक अहंकारी हे कायम या मुलासोबत जोडलेले असतात.नागपंचमी, राखीपौर्णिमा, भाऊबीज आणि रंगपंचमी हे सगळे सण विनायक अहंकारी या मुक बधिर शाळेतील मुलांसोबत साजरा करतात.

श्रीकृष्ण विद्यालयात कल्पफलकांचे अनावरण

आलुर, दि.८ ऑगस्ट -

श्रीकृष्ण विद्यालयात कल्प फलकांचे अनावरण विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. ही कल्पना कलाशिक्षक चव्हाण जीवन यांची होती. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलांचा वाव मिळावा टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तु तयार करण्याचे सांगितले. यात इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने विविध वॉलपीस तयार केले या कार्यक्रमासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक कदम, उपमुख्याध्यापक अजय गायकवाड, कलाशिक्षक जीवन चव्हाण, भालेराव, अविनाश पाटील, खंडू म्हेत्रे, संदीप चव्हाण, संतोष ईबत्ते, गंगाराम लोखंडे व इयत्ता पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

पार्वती कन्या प्रशालेत इको क्लबची स्थापना

जळकोट, दि.८ ऑगस्ट -

पार्वती कन्या प्रशाला, जळकोट येथे इको क्लबची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार पार्वती कन्या प्रशालेमध्ये इको क्लबची स्थापना करण्यात आली. इको क्लब फॉर मिशन लाईफचे प्रमुख म्हणून मुख्याध्यापिका लता सोमवंशी, प्रभारी शिक्षक म्हणून राष्ट्रीय हरित सेना प्रमुख अभिमन्यू कदम यांची निवड करण्यात आली. प्रत्येक वर्गातून तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये प्रेमनाथ कदम, प्रतीक्षा भोगे, महेश सावंत, वैष्णवी बिराजदार, सौदागर जाधव, विराज सुरवसे, प्रांजल सगर, महेश सावंत, मनोज कार्ले, शंभुराज सावंत, परवेज बागवान, आराध्या कदम, देवयानी लोखंडे, विनायक कदम, श्रीशैल पाटील, कदम सरस्वती, ज्ञानेश्वर कडते, श्रेयस कदम या विद्यार्थ्यांची इको क्लब सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

राष्ट्रीय मूल्यांकनात जळकोट प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्ह्यात दुसरे

तभा वृत्तसेवा
जळकोट, दि.८ ऑगस्ट -

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत केलेल्या राष्ट्रीय पातळीवरील मूल्यांकनात धाराशिव जिल्ह्यातून दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. जळकोट प्राथमिक आरोग्य केंद्राला झालेल्या मूल्यांकनात एकूण ९३.९४ टक्के गुण मिळाले.

नवी दिल्ली येथील आरोग्य मंत्रालयाच्यावतीने एका खास टीमने प्राथमिक आरोग्य केंद्र देत असलेल्या सेवेचे मूल्यांकन करण्यात आले होते. या प्राथमिक आरोग्य केंद्राची जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर निवड झाली होती. या टीमने नुकतीच जळकोट प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन परीक्षण केले होते. त्यांचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून, धाराशिव जिल्ह्यातून ईटकुर प्राथमिक आरोग्य केंद्र प्रथम तर जळकोट प्राथमिक आरोग्य केंद्राला दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. विविध सेवेची यात टीमने गुणवत्तापूर्वक पाहणी करून गुण दिले आहेत. या यशात वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहिणी जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ.मधुरा ढोले, डॉ. प्रमोद बर्मा, डॉ. नाजिया शेख, डॉ. सुप्रिया मोकाशे, आरोग्य सहाय्यक मुसाखान पठाण, आरोग्य सहाय्यक ज्ञानेश्वर लगड, आरोग्य सह्यायिका ढगे गोखरणा, आरोग्य सेवक कोळगे आण्णासाहेब, डी.जे. जगताप यांच्यासह आदिंचे योगदान आहे.

या यशाबद्दल ग्रामस्थांमधून अभिनंदन करण्यात येत आहे.

नाग चतुर्थी उपवासानिमित्त नागनाथ मंदिरात वारूळ पूजनासाठी महिलांची गर्दी

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.८ ऑगस्ट -

तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथील जागृत नागनाथ महाराजांचा यात्रा महोत्सव दि.४ ऑगस्टपासून सुरू आहे. दि.९ रोजी गावातील प्रमुख मार्गावरून मंदिराचे मुख्य पुजारी तथा खरगा गण सद्गुरु स्वामी महाराज आणि नागनाथ महाराजांच्या पालखीची भव्य मिरवणूक होणार आहे.

तत्पूर्वी नागपंचमीच्या आदल्या दिवशी दि.८ रोजी नागा चतुर्थी उपवासानिमित्त माहेरवाशींनी आणि महिलांनी वारूळ पूजनासाठी म हिलांनी नागनाथ महाराज देवस्थान परिसरात मोठी गर्दी केली होती. पारंपरिक नागपंचमीचे गाणी गात महिलांनी फेर धरला होता.

सावरगाव नागनाथ महाराज यात्रेनिमित्त नागपाल विंचू पाच दिवस एकत्रित वास्तव करतात यात्रेला पारंपारिकतेचा साज असल्याने यात्रा आगळीवेगळी समजली जाते.

लाडकी बहिण योजनेचे लाभार्थी वाढवण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत : आ. ज्ञानराज चौगुले

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.८ ऑगस्ट -

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्याकरिता राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू केली असुन या योजनेची विधानसभा निहाय समिती नेमण्यात आली आहे. या अनुषंगाने आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रनिहाय समितीची बैठक तहसिल कार्यालय, उमरगा येथे गुरुवार दि.८ ऑगस्ट रोजी संपन्न झाली.

उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रीय समितीद्वारे ३८९८९ अर्जांना मंजुरी...

यावेळी आ. ज्ञानराज चौगुले यांनी सदर योजनेबाबत दोन्ही तालुक्यातील आ ढावा घेतला. प्रशासनाने या योजनेचे लाभार्थी वाढवण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करावेत. गावोगावी ग्रामीण भागात ग्रामपंचायत संगणक परिचालक यांनी ऑनलाईन करण्यासाठी सहकार्य करावे. ज्या लाभार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज जमा केले आहेत अशांचे ऑफलाईन अर्ज प्रशासनाने करून घ्यावेत जेणेकरून एकही पात्र महिला वंचीत राहणार नाही अशा सुचना यावेळी त्यांनी केल्या आहेत. आजघडीस उमरगा तालुक्यातील एकुण २७०६६ व लोहारा तालुक्यातील ११०२२३ असे एकुण ३८९८९ लाभार्थ्यांच्या अर्जास उमरगा लोहारा विधानसभा क्षेत्रिय समितीने आज मंजुरी दिली आहे.

सदर बैठकीस समितीचे सदस्य सचिव तथा उपविभागीय अधिकारी गणेश पवार, सदस्य किरण रविंद्र गायकवाड, शितल पाटील यांच्यासह गोविंद येरमे, तहसिलदार उमरगा, काशीनाथ पाटील तहसिलदार लोहारा, रामकृष्ण जाधवर मुख्याधिकारी उमरगा, समीर भुजबळ मुख्याधिकारी मुरूम, डी. के.वाघ बालविकास प्रकल्प अधिकारी उमरगा, किशोर गुरव, बालविकास प्रकल्प अधिकारी, लोहारा हे उपस्थित होते.

प्रशासनाविरोधात मुरूम येथे आज हिंदुजन आक्रोश मोर्चा

तभा वृत्तसेवा
मुरूम, दि.८ ऑगस्ट -

मुरूम शहरातील आठवडी बाजार आणि मुख्य रस्त्यावरील सरकारी जागेवर तसेच लिंगायत स्मशानभूमीच्या ठिकाणी अतिक्रमण करून मांस विक्री केली जात आहे. सदरील दुकाने इतरत्र हटवण्यात यावी अश्या मागणीचे निवेदन मुरूम नगर परिषदला देण्यात आली आहे. मात्र यासंदर्भात मुख्याधिकारी सचिन भुजबळ जाणीवपूर्वक कारवाई करत नाहीत असा आरोप हिंदुत्ववादी संघटनेकडून होत असून यासाठी दि.९ रोजी हिंदूजण आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे माहिती आयोजकांनी दिली आहे.

मुरूम शहरातील बसस्थानकासमोर लिंगायत समाजाची स्मशानभुमी आहे. याठिकाणी अनेकांनी अतिक्रमण करून दुकाने थाटली आहेत. चिकण व मटण विक्री दुकाने असल्याने मोठी दुर्गंधी पसरत आहे.

अश्यातच स्मशानभूमीवरच कोंबड्या कापण्याचे प्रकार होत असल्याने समाजाच्या भावना दुखावल्या जात आहेत. त्याचप्रम ाणे छत्रपती शिवाजी चौक ते सरकारी रुग्णालय रस्त्यावरील उत्तर बाजूस मटण विक्री दुकाने आहेत. या दुकानातील टाकाऊ पदार्थ चक्क मुख्य रस्त्यावर उघड्यावर टाकली जातात. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकाना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याच दुकानसमोर भटकंती कुत्रे वावरत असतात.

त्यामुळे महिला व शालेय विद्यार्थ्यांना धोकादायक परिस्थितीतुन मार्ग काढावा लागत आहे. त्यामुळे नगर परिषदला व पोलीस विभागाला याबाबत शहरातील हिंदुत्ववादी संघ व बसवेश्वर युवक मंडळच्यावतीने निवेदन देऊन कार्यवाही करण्यासाठी मागणी करण्यात आली होती. मात्र संबंधित प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे.

त्यामुळे शुक्रवारी हिंदुत्ववादी संघटनेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मुरूम नगर परिषदपर्यंत हिंदूजन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती दत्ता हुळमुजगे, प्रदीप गव्हाणे, आकाश क्षीरसागर, शिवा पांचाळ आदींनी दिली आहे.

मनोज जरांगे-पाटील यांचा सातलिंग स्वामींकडून सत्कार

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.८ ऑगस्ट -

मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांची सोलापूर येथे मराठा क्रांती मोर्चाच्या शांतता रॅलीसाठी सोलापूर येथे आले असता त्यांची सोलापूर येथे उमरगा जिल्हा धाराशिव येथील रहिवाशी असलेले व उमरगा-लोहारा मतदारसंघातून आगामी विधानसभा निवडणूक लढवणारे सामाजिक कार्यकर्ते सातलिंग स्वामी यांनी सदिच्छा भेट घेऊन शाल, पुष्पहार, देऊन यथोचित सत्कार केला.

विशेष बाब म्हणजे सदर निवडणूक लढवण्यासाठी मी माझ्या नोकरीचा राजीनामा दिला आहे व तो मंजुरीही झालेला आहे. त्यामुळे मी निवडणूक लढवण्यावर ठाम आहे असे सांगितले. त्यावर मराठा योध्दा मनोज जरांगे-पाटील यांनी तुम्ही मतदारसंघातील नागरिकांच्या आणखी संपर्कात रहा त्या-त्या वेळी

आपल्या संदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी सातलिंग स्वामी व सोबत असलेल्या शिष्टमंडळास दिली.

याप्रसंगी सातलिंग स्वामी यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे उमरगा तालुकाध्यक्ष शिवश्री अण्णासाहेब पवार, विजयकुमार स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते.

मराठा आरक्षणावरुन महाराष्ट्राचा बांगलादेश होवु देणार नाही...

सरसगट कुणबी आरक्षण घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही : जरांगे पाटील

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.८ ऑगस्ट -

मराठा आरक्षण वरुन महाराष्ट्रात उद्रेक सारखी परिस्थिती आक्रोश आहे. परंतु आरक्षणावरुन महाराष्ट्रात बांगलादेश सारखी हिंसक परिस्थिती पाऊले मराठे येथे निर्माण होवू देणार नाहीत आणि उचलणार नाहीत. मात्र पन्नास टक्के आतुनच सरसगट मराठ्यांना ओबीसी कुणबीमधुन आरक्षण मिळवुन दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा मनोज जरांगे-पाटील यांनी बुधवारी तुळजापूर येथे पत्रकार परिषदेत दिला.

यावेळी पुढे बोलताना जरांगे-पाटील म्हणाले की, माझ्या विरोधात भाजपचे देंवेद्र फडणवीस यांनी अभियान, टोळ्या निर्माण केल्या आहेत. त्याचाच भाग अचानकपणे नारायण राणे, प्रकाश दरेकर यांना मी कुठल्याही आवाहनाची भाषा न वापरतात मला आवाहन देण्याची भाषा करतात. मी राणेला मराठवाड्यात पाय ठेवु देणार नाही, असे म्हटले का? असा सवाल करुन सगळ्यांचा पाठपुरावा करायला म राठे खंबीर आहेत. आम्ही कोणाला मोजत नाहीत, असा अप्रत्यक्ष इशारा राणेला दिला. राज ठाकरे लपवाछपवीत माहीर आहेत. ते फडणवीस अभियान टोळीतीला असु शकतात. धाराशिव येथील मराठ्यांच्या मुलांच्या तावडीतुन

सुटका करुन घेण्यासाठी मला बोलतो असे म्हणाले. पण ते मला बोलणार नाहीत. ते लपवाछपवीत माहीर आहेत असे म्हणाले. ज्या-ज्या पक्षाचे नेते माझ्या विरोधात बोलायला गेले त्या दिवसापासुन मराठे बाहेर पडायला लागले. ओबीसी आरक्षणासाठी त्यांचा सम ाज पक्ष नेते महत्त्व देतात. त्यामुळे भाजपातील मराठा नेत्यांना आता लक्षात आले आहे की आपल्याला मराठा लेकरांना आरक्षण गरजचे आहे. त्यामुळे भाजप शेकडो नेते माझ्या संपर्कात असल्याचा गौप्यस्फोट यावेळी केला.

मराठा आरक्षणाला सर्वात म ोठा अडथळा राज्य सरकार आहे असा गंभीर आरोप यावेळी केला. कुणबी प्रमाणपत्र देणे व्हॉलीडीटीत अडथळा आणणे, नोंद शोधणे कामे थांबवणे हे अभियान सरकार चे षढयत्र असल्याचे सांगुन आम्हाला दहा टक्के आरक्षण मान्यच नाही. ई डब्युसी रद्द करणे यामुळे या सरकारने मराठ्यांचे वाटोळे केल्याचा आरोप केला. ईडब्युलीसी ऑप्शन खुला असणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले. मुलींना मोफत शिक्षण कुठे आहे असा सवाल करुन पुण्यातील मुली आजही पासष्ट हजार पंचाऐंशी हजार रुपये देवुन शिक्षण घेत असल्याचे सांगितले. अभियानच्या टोळ्या कितीही माझ्या अंगावर घाला पण एक लक्षात घ्या मराठ्यांचा नाद करु नका कारण मराठा आता चवताळला आहे. मराठ्यांच्या नादी लागाल तर देवेंद्र फडणवीसमुळे भाजपचा सुफडा होईल असा इशारा यावेळी दिला.

आम्ही सर्वसामान्य उमेदवार देणार असे सांगुन बोगस आरक्षण तेलंगी, महाराष्ट्र सदन घोटाळात असणारा बोगस समिती अध्यक्ष असल्याची टीका यावेळी नाव न घेता भुजबळांवर केली. ज्यांच्या नोंद कुणबी असतील अशा नोंद मुस्लीम, ब्राम्हण, मारवडीसह कुण्याही जातीच्या सापडू द्या त्यांना कुणबी प्रमाण द्या, असे ते यावेळी म्हणाले.

अग्रलेख...

आता कुठे गेला कथित पुरोगाम्यांचा आक्रोश?

बांगलादेशात सत्तांतराची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी अल्पसंख्यक हिंदू समाजाला लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. जमावाकडून हिंदूंवर हल्ले केले जात आहेत. अनेकांची घरे जाळण्यात आली असून दुकानांमध्ये लुटालूट केली जात आहे. देशात आरक्षणाच्या मुद्यावरून सुरू झालेला हिंसाचार टोकाला पोहोचला आहे. पंतप्रधान शेख हसीना यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन भारतात आश्रय घेतल्यानंतरही आंदोलकांची आक्रमकता कमी झालेली नाही. आंदोलकांनी त्यांच्या निवासस्थानासह अवामी लीगचे नेते आणि त्यांच्या कार्यालयांवरही हल्ले केले आहेत. शेख हसीना यांच्या घरातील कपड्यांसह अनेक खाजगी वस्तू लांबवल्या गेल्या आहेत. त्यांच्या वाहनांची जाळपोळ झाली आहे. त्यांच्या दिवाणखान्यात आणि शयनकक्षात आंदोलकांनी धुडगूस घातला आहे. आता हिंदूंवर गोळ्या घालून त्यांना वेचून ठार केले जात आहे. मेहरपूर मंदिरातील जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा देवीच्या मूर्ती जाळण्यात आल्याने हिंदू भयभीत झाले आहेत. बांगलादेशात उद्‌भवलेल्या परिस्थितीबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि तत्सम संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. तेथील हिंदूंच्या सुरक्षिततेबाबत केंद्र सरकारने पावले उचलावी, अशी मागणी संघाचे वरिष्ठ नेते भय्याजी जोशी यांनी केली आहे. बांगलादेशमधील हिंदूंना लक्ष्य केले जात आहे. तेथील हिंदूंच्या घरादारांना आगी लावून त्यांना हुसकावून लावल्या जात आहे, याकडे विहिंपने केंद्र सरकारचे लक्ष वेधले आहे. विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष आणि ज्येष्ठ वकील आलोक कुमार यांच्या मते बांगलादेशात हिंदूंची घरे, दुकाने, कार्यालये, व्यावसायिक प्रतिष्ठाने, महिला, मुले तसेच मंदिरे, गुरुद्वारा आणि इतर श्रद्धा केंद्रेही सुरक्षित नाहीत. तिथल्या अत्याचारित अल्पसंख्यकांची स्थिती वाईटाहून वाईट होत चालली आहे. हिंसक जमावाच्या तावडीतून सुटका व्हावी, म्हणून महिला आणि मुले आक्रोश करीत असल्याचे व्हिडीओ लक्ष विचलित करून टाकत आहेत. महिलांवर बलात्कार झाले असून त्यांच्या लज्जारक्षणाचा कोणी वालीच उरलेला नाही. आंदोलकांना आपण कुणाला लक्ष्य करीत आहोत, याचेही भान राहिलेले नाही. अनेक संस्था-संघटनांसह सामाजिक व राजकीय नेते बांगलादेशातील हिंसाचाराची निंदा करीत असताना आपल्या देशातील कथित पुरोगामी कोणत्या रेतीत चोचा खुपसून बसले आहेत, हे कळायला मार्ग नाही. एरवी मुसलमानांची बाजू घेणारे असदुद्दीन ओवैसी यांची बांगलादेशबाबतची कुठलीही प्रतिक्रिया आलेली नाही. काँग्रेस पक्षाने सर्वपक्षीय बैठकीत बांगलादेशमध्ये विदेशी शक्तींचा हात दिसतो आहे का, असा थातूरमातूर प्रश्न उपस्थित करून वेळ मारून नेली आहे. लहान-मोठ्या प्रश्नांवर थयथयाट करणाऱ्या ममता बॅनर्जींनी असहाय्य हिंदूंबद्दल सहानुभूतीही व्यक्त केलेली नाही. डाव्या पक्षांना तर चेवच आलेला आहे. त्यांच्या समर्थकांना, शेख हसीना यांना जसे सत्ताच्युत केले तसेच मोदींनादेखील पायउतार करण्याची संधी मिळाल्याचा आनंद मिळाला आहे. देशातील अल्पसंख्यकांच्या साध्या अवैध मजारींवर बुलडोझर चालला तरी पोटदुखी सुरू होऊन, जे पोपटपंची करतात, त्यांचे ओठ आज शिवलेले दिसत आहेत. स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या या मंडळींची खरे तर प्रतिगाम्यांनाही मागे टाकणारी मानसिकता यातून दिसून येत आहे.

या परिस्थितीचा फायदा घेत सीमेपलीकडून घुसखोरीचा मोठा प्रयत्न होण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही. अनेक विस्थापितांनी भारत-बांगला सीमेकडे धाव घेतली आहे. याबाबत भारत सरकारला सावधानी बाळगावी लागणार आहे. आपल्या सुरक्षा दलांना सीमेवर कडक नजर ठेवणे तसेच कोणत्याही प्रकारची घुसखोरी टाळण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. देशातील हिंसाचारात आतापर्यंत ४४० लोकांचा मृत्यू झाला आहे. अशांततेमुळे बांगलादेशात राहणारे हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चनांशिवाय अहमदियांसारखे अल्पसंख्यक दहशतीत आहेत. बांगलादेशच्या ६४ जिल्ह्यांपैकी ४४ जिल्ह्यांत हिंदू आणि बुद्धविहारांना लक्ष्य करण्यात आलेले आहे. बांगलादेश हिंदू-बौद्ध-ख्रिश्चन ऐक्य परिषदेचे सरचिटणीस राणा दासगुप्ता यांनी देशातील अल्पसंख्यक समाजाची परिस्थिती शब्दात मांडण्यासारखी नाही, असे मत व्यक्त केले आहे. पोलिस ठाण्यांमध्ये सुरक्षा नावालाही उरलेली नाही. लष्कराचे आपत्कालीन सेवेतील नंबर बंद पडलेले आहेत. ईशान्य सिराजगंज आणि रंगपूरमध्ये दोन हिंदू नेत्यांची हिंसक जमावाने हत्या केली. कारण काय तर हे दोघे शेख हसीना यांच्या अवामी लीगचे मोठे नेते होते. अनेक हिंदू परिवारांनी भीतीपोटी परिसरातील लहान गावांकडे आश्रयासाठी धाव घेतली असून या परिस्थितीत आणखी किती दिवस कंठावे लागतील, याची शाश्वती नाही. देशभरातील हिंसाचारात अनेक पोलिस अधिकारी मारले गेले आहेत. ढाक्यात आंदोलकांनी पोलिस मुख्यालयासह १३ पोलिस ठाण्यात तोडफोड करून तेथे आग लावली. पोलिसांची शस्त्रेसुद्धा लुटून नेण्यात आली. पोलिसांच्या हत्येच्या विरोधात कर्मचारी संघटना आणि बांगलादेश पोलिस संघाने संपाची घोषणा केली आहे. मात्र, त्याचा जिहादी आंदोलकांवर काही परिणाम होईल, याची शक्यता नाही. आंदोलकांच्या रागाचा पारा इतका चढलेला आहे की, त्यांनी बांगलादेशचे निर्माते शेख मुजिबूर रहमान यांच्या पुतळ्याचीही तोडफोड केली आहे. शेख हसीना सरकारचे ९ मंत्री आणि राज्यमंत्र्यांच्या घरांसह कमीत कमी २७ खासदारांवर हल्ला झाला असून त्यांची घरे जाळली गेली आहेत. राजधानीच्या संचारबंदीत आता थोडी ढील देण्यात आली असली, तरी देशातील वातावरण पूर्वस्थितीत येण्यास बराच कालावधी लागणार आहे. बांगलादेशातल्या तरुण आंदोलकांनी चारित्र्याच्या बाबतीत जी नीच पातळी गाठली आहे, तिचे लोण जगभर पसरणार नाही, याची खात्री कुणी देऊ शकेल का? राजकीय मतभेद, वैचारिक मतभेद अगदी अवश्य असू शकतात, पण ते महिलांच्या चारित्र्याची विटंबना करण्यापर्यंत यावेत, हा अध्याय गंभीर आहे. इस्लामवाद्यांनी देशातील हिंसाचाराचा फायदा उठवण्याचा निर्णय घेतला असून ते हिंदूंवर हल्ले करीत आहेत, हे स्पष्ट आहे. देशभरात ठिकठिकाणी इस्लामवादी जमाव हिंदूंच्या घरांवर हल्ले करीत असतानाचे, जाळपोळीचे, महिलांचे अपहरण करतानाच्या व्हिडीओंची दखल घेणारे बांगलादेशात कुणीही उरलेले नाही. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार गटांनी हिंसाचाराचा निषेध केला आहे आणि हिंदू अल्पसंख्यकांच्या संरक्षणासाठी त्वरित कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. बांगलादेशातील इस्लामिक कट्टरतावादी शक्तींनी ढाका येथील धनमंडी येथील प्रसिद्ध बांगलादेशी हिंदू गायक राहुल आनंद यांच्या १४० वर्षे जुन्या घरावर हल्ला केला, घराला आग लावली; ज्यात तीन हजारांहून अधिक वाद्ये जळून खाक झाली. आग लावण्यापूर्वी त्यांच्या घरातील साहित्य लुटण्यात आले. यावेळी राहुल आनंदच्या कुटुंबीयांनी अज्ञात स्थळी पळून कसा तरी जीव वाचवला. विशेष म्हणजे ज्या भाईचाऱ्याचा या गायकाला अभिमान होता, तो त्याच्या कुठल्याच कामात आला नाही. बांगलादेशातील बंडामागे आंतरराष्ट्रीय बँका, काही राजकीय घराणी, लेफ्ट लिबरल्स, जॉर्ज सोरोस यांची कटकारस्थाने आणि पाकिस्तानातील जमातेच्या जिहाद्यांचा हात असल्याची बाब दडून राहिलेली नाही. देशातील सत्तांतर विद्यार्थी आंदोलनाने झाले, असे जरी जगाला दाखविले जात असले, तरी त्यामागे दडलेल्या शक्ती कोण हे लपून राहिलेले नाही. इंग्लंड, फ्रान्स, इटलीमध्ये उत्पात माजवून अस्थिरता निर्माण करण्याचा अनुभव या शक्तींना येथे कामात आला आहे. पाकिस्तान, अफगाणिस्तानप्रमाणेच आता बांगलादेशातही आपले कठपुतळी सरकार स्थापन करण्याची या शक्तींची मनीषा लवकरच पूर्ण झालेली दिसणार आहे. मात्र, या साऱ्या गोंधळाबाबत कथित पुरोगाम्यांनी मिठाची गुळणी करून साधलेली चुप्पी अनाकलनीयच म्हणावी लागेल. त्यांचा आक्रोश कुठे गेला, हा प्रश्न साऱ्यांना पडला आहे. ■

इतस्ततः

डॉ. विवेक राजे

वक्फ बोर्ड... निरस्तीच योग्य...

जागतिक मुस्लिम समाजाची जर (म्हणजे संपत्ती), जोरू (म्हणजे स्त्री, त्यातही पुनरुत्पादन क्षमता असलेली स्त्री) आणि जमीन (म्हणजे भूमी) यांची भूक वेगवेगळ्या पद्धतीने आपल्या लक्षात येते. धर्म विस्ताराची तसेच नवीन जर, जोरू आणि जमीन मिळविण्याची प्रत्येक संधी साधण्यासाठी इस्लाम धर्मीय सतत प्रयत्नशील असतात. हा देश स्वतंत्र होणार हे १९४५-४६ मध्येच स्पष्ट झाले होते आणि स्वातंत्र्य म्हणजे लोकशाही व्यवस्था असणार, हे देखील जनतेला निश्चित माहिती होते. मुस्लिम समाजाला बहुसंख्य हिंदूंच्या लोकशाहीमध्ये राहायचे नव्हते. त्यातही मुस्लिम जमीनदार, जहागीरदार यांना हिंदू शासित भारतात राहायचे नव्हते. कारण एखाद्या मर्यादित का होईना, पण जमिनीवर आपण हुकूमत चालवत होतो, आपण जेते होतो ही त्यांची समजूत होती तसेच पाकिस्तानात आपली संख्या जास्त राहील, तो भाग मुस्लिमबहुल होईल, म्हणून तेथे वेगळी व्यवस्था अस्तित्वात येणार, याचीही जाणीव या समाजाला होतीच. हा समाज त्या दृष्टीने तजविजीला लागला होता. हिंदुस्थानातील आपल्या जमिनी व संपत्तीवरील अधिकार कायम कसा ठेवता येईल याचा. यावर दोन उपाय केले गेले. एक म्हणजे एकाच कुटुंबातील दोन भावांनी हिंदुस्थानात राहायचे तर दोघांनी पाकिस्तानात जाऊन राहायचे. तेथील मिळेल ती जमीन येनकेनप्रकारेन ताब्यात घ्यायची आणि अशारीतीने दोन्ही ठिकाणी दावेदारी ठोकायची. दुसरे म्हणजे संपूर्ण कुटुंबाने पाकिस्तानात जायचे, पण इथल्या आपल्या मालकीच्या असलेल्या नसलेल्या जमिनी धर्मदाय, म्हणजे वक्फ करून टाकायच्या. जेणेकरून या देशात राहणारे आपलेच मुसलमान भाईबंद या जमिनीचा ताबा ठेवू शकतील. मुस्लिम समाज त्या काळात अशा पद्धतीने तजवीज करून स्थलांतरित झाला. हिंदू समाजाने मात्र असे कोणतेही नियोजन केले नव्हते. शिवाय पाकिस्तानातील सरकार हिंदू किंवा अल्पसंख्यकधार्जिणेदेखील नव्हते. 'वक्फ' याचा शब्दशः अर्थ जरी 'धर्मदाय' असा असला, तरी इस्लामनुसार, वक्फ करणारी व्यक्ती ही मुसलमानच असणे आवश्यक आहे. तसेच या संपत्तीचा वापर फक्त मुस्लिम समाजासाठीच केला जावा, हेही इस्लामनुसार गरजेचे आहे. त्यामुळे येथून लाखो मुसलमानांनी स्थलांतरित होताना आपली मालमत्ता वक्फ केली. मुसलमानांच्या या धर्मदाय केलेल्या संपत्तीची नीटपणे व्यवस्था लावण्यासाठी नेहरूंच्या मुस्लिमधार्जिण्या सरकारने वक्फ बोर्डाची स्थापना केली. भारत सरकारने १९५४ मध्ये वक्फ ॲक्ट पारित करून या वक्फ केलेल्या संपत्तीचे आगणन आणि नियंत्रणाचे अधिकार वक्फ बोर्डाला दिले. याद्वारे वक्फ बोडने लाखो एकर जमिनीवर मालकी हक्क मिळवला. यासाठी वापरली गेलेली विचित्र पद्धत अशी की, एखादी जमीन वा मालमत्ता आपल्या मालकीची आहे, असा वक्फ बोर्ड दावा करीत असते. मग त्या मालमत्तेची कागदपत्रं तपासणी करून वक्फ सर्वे कमिशन ती मालमत्ता वक्फची आहे, असे जाहीर करीत असते. जर कोणाला याविषयी काही आक्षेप असेल तर ते नोंदविण्यास सांगितले जाते. विशिष्ट मुदतीत आक्षेप नोंदविला गेला नाही तर ती मालमत्ता वक्फची संपत्ती होत असते. आक्षेप नोंदविला गेला तर वक्फ न्यायाधीकरणासमोर पुन्हा सर्व गोष्टींची पडताळणी केली जाते. त्या उपरांत वक्फ न्यायाधीकरण निर्णय देत असते, जो नेहमीच मुस्लिम पक्षाच्या वा वक्फ बोर्डाच्या बाजूने असतो. याला कारण वक्फ न्यायाधीकरणात वकील, न्यायाधीश सगळे मुसलमानच असतात. वक्फ न्यायाधीकरणाचा निर्णय मान्य नसल्यास पुढे उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढत चालत असते.

येथे एक लक्षात घेतले पाहिजे की, वक्फ बोर्डावर सगळ्या नेमणुका केंद्र सरकार करते, केंद्रीय अल्पसंख्यक मंत्री या बोर्डाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. हे बोर्ड आपल्या 'वक्फ सर्वे कमिशन'वरील सर्व नेमणुका करते. वक्फ न्यायाधीकरणावरील नेमणुकादेखील वक्फ बोर्डच करीत असते. स्मृती इराणी यांचा अपवाद वगळता आतापर्यंत सर्व अल्पसंख्यक मंत्री हे मुस्लिमच होते. देशभरात अनेक ठिकाणी सरकारी जमिनीवर वा कोठेही, छोट्या-मोठ्या मजारी उभारल्या गेल्या. जमिनी हडप करण्याची इस्लामची प्रमाणित पद्धत वापरण्यात येऊन ९ लाख एकरपेक्षा जास्त जमिनीवर वक्फ बोर्डाने ताबा मिळविला आहे. कोणी विरोध केला तर झुंडीने त्याला नामोहरम केले जाते. कोणी कायदेशीर बडगा उगारला तर वक्फ न्यायाधीकरण मग उच्च व सर्वोच्च न्यायालय अशी वेळकाढू प्रक्रिया राबवत अशा लोकांना नामोहरम करण्यात आले आहे. मिळत असलेल्या माहितीनुसार भारतात सद्यस्थितीत सहा लाखांहून अधिक पंजीकृत मालमत्ता व नऊ लाख एकरपेक्षा जास्त जमीन वक्फ बोर्डाच्या मालकीची आहे. तर, २०२० च्या राष्ट्रीय वक्फ प्रबंधन समितीच्या आकडेवारीनुसार वक्फ बोर्डाजवळ ६,१६,७३२ पंजीकृत मालमत्ता आहेत. हे सगळे आकडे थक्क करणारे आहेत. याचा अर्थ फाळणीच्या रूपाने जेवढी जमीन आम्ही मुसलमानांना (पाकिस्तान आणि बांगलादेश मिळून) दिली त्याच्या जवळपास ६० टक्के जमीन आजही भारतात वक्फ बोर्डाच्या म्हणजेच मुस्लिम समाजाच्या ताब्यात आहे तसेच ते विविध मार्गांनी अधिकाधिक जमीन बळकावत आहेत.

या सगळ्या परिस्थितीत एक दिलासा देणारी घटना २९ एप्रिल २०२२ ला घडली. सर्वोच्च न्यायालयाने वक्फ बोर्ड राजस्थान विरुद्ध जिंदाल सॉ लिमिटेड आणि इतर या (संदर्भ. सिव्हिल अपील नंबर २७८८/८९ ऑफ २०२२) खटल्याचा निकाल देताना वक्फ बोर्डाच्या मनमानीला लगाम लावला. हा खटला म्हणजे वक्फ बोर्डाच्या उद्दामपणाचा एक नमुना होय तर निकाल म्हणजे या उद्दामपणाला घातलेला लगाम होय. उपरोक्त खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने वक्फ बोर्डाला स्पष्टपणे खडसावले आणि निर्णय दिला की, तुम्हाला प्राप्त प्रत्येक मालमत्तेचा स्रोत सांगावाच लागेल. कोणी आक्षेप घेतला नाही म्हणून कोणतीही मालमत्ता तुमची होत नाही तसेच कोणत्याही ठिकाणी मजार बांधून ती जागा वक्फची मालमत्ता होत नाही. जमीन तुम्हाला कोणी दिली आणि ती जमीन त्या देणाऱ्या व्यक्तीच्या मालकीची होती, हे कागदोपत्री पुराव्याने तुम्हाला साबीत करावेच लागेल. पुन्हा एकदा वक्फ बोर्डाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या मागील पृष्ठभूमी अशी की, १९५४ मध्ये नेहरू सरकारने पारित केलेल्या वक्फ कायद्यात १९९५ साली नरसिंह राव यांच्या सरकारने तर २०१३ मध्ये मनमोहन सिंग यांच्या सरकारने काही हिंदू समाजविरोधी बदल केले. या बदलांमुळे वक्फ बोर्डाला हिंदू व लोकशाहीविरोधी अमर्याद अधिकार देण्यात आले आहेत. या अधिकारांचा प्रचंड गैरफायदा घेत वक्फ बोर्ड आपल्या संपत्तीत वाढ करीत भारतात छुपे गजवा-ए-हिंद करीत आहे. एक प्रकारे अवैध मार्गाने जमिनींची मालकी मिळवत हा देश दार-उल-इस्लाम करण्याचे हे षडयंत्र आहे. इस्लामच्या बाबतीत कोणतेही बदल आज संभवत नाहीत. मागील दोन हजार वर्षांपासून कालानुरूप असे कोणतेही बदल इस्लाममध्ये घडलेले नाहीत. आपल्याभोवती असलेल्या पाकिस्तान आणि बांगलादेश या मुस्लिमबहुल देशांमध्ये अल्पसंख्यक समाजासाठी या धर्तीवर कोणतेही प्रारूप अस्तित्वात नाही. या पृष्ठभूमीवर फक्त मुस्लिम स्मशानभूमीची वेगळी व्यवस्था निर्माण करीत एका झटक्यात वक्फ बोर्ड निरस्त करणे हेच देशहिताचे ठरणार आहे. आज बहुसंख्य हिंदूंची वक्फ बोर्ड निरस्त करण्याचीच मागणी आहे. या देशात सीएए आणि एनआरसीच्या बाबतीत झालेला विरोध, आंदोलनं आणि जनतेची हायवे अडवून केलेली अडवणूक या सगळ्या गोष्टी पाहता वक्फ बोर्ड निरस्त, हेच देशहिताचे पाऊल असेल हे निश्चित... ■

९८८१२४२२२४

वेध

नीलेश जोशी

आता चोख उत्तर द्या!

'जाकी रही भावना जैसी, प्रभू मूरत देखी तिन तैसी...' कवी तुलसीदासांनी 'रामचरित मानस' या ग्रंथात या ओवी लिहिल्या आहेत. ईश्वराला ज्या रूपात तुम्ही पाहाल त्या रूपात ईश्वर दिसेल, असा अर्थ या ओवींचा होतो. अर्थात, पवित्र भावनेने ईश्वराला स्मरणे मात्र आवश्यक आहे. पण ईश्वराचे स्मरण तर दूरच; ईश्वराच्या, प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वाबाबत शंका घेणारे महाभाग आजही येथे आहेत. एकीकडे बौद्ध बहुसंख्य असलेल्या श्रीलंकेतही प्रभू श्रीराम, सीता तसेच रावणादींशी संबंधित स्थाने जतन करण्याचा, त्यांचे संवर्धन, विकास करण्याचा प्रयत्न होतो. तर, दुसरीकडे 'प्रभू श्रीरामांच्या अस्तित्वाचा पुरावा नाही,' असे तामिळनाडूतील द्रमुक अर्थात द्रवीड मुन्नेत्र कळघम् पक्षाचा मंत्री एस. एस. शिवशंकर बरळतो. हे अनवधानाने अज्ञानातून केलेले विधान नक्कीच नव्हे तर येथील धर्म, संस्कृतीच्या द्वेषातून केलेले हे विधान आहे. अर्थात ज्या इंडिया आघाडीशी द्रमुकचा संबंध आहे त्या इंडिया आघाडीतील घटक पक्षांचा हा द्वेष वारंवार यापूर्वीही समोर आला आहे.

तामिळनाडूसह देशात विविध ठिकाणी प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेली स्थाने आजही आहेत. लहान-थोर, श्रीमंत-गरीब, शिक्षित-अशिक्षित अशा सर्वच हिंदूंची ही श्रद्धास्थाने. विज्ञानाच्या कसोटीवर ज्यांना या बाबी तपासायच्या असतात त्यांच्याकरिता जगप्रसिद्ध अंतराळ संशोधन करणाऱ्या इस्रोनेदेखील रामसेतूचे अस्तित्व मान्य केले आहे. पण झोपेचे सोंग घेणाऱ्याला उठविता येत नाही, हेच सत्य. भारतात श्रीरामाने वास्तव्य केलेल्या विविध ठिकाणांसह ज्या तामिळनाडूत हे मंत्री राहतात त्या तामिळनाडूतील रामेश्वरम् येथे स्वतः प्रभू श्रीरामाने स्थापन केलेले रामेश्वरम्चे शिवलिंग यासह श्रीलंकेत प्रभू श्रीराम, सीतामाई यांच्याशी संबंधित असलेली स्थाने हा श्रीरामाच्या अस्तित्वाचा पुरावा नव्हे तर काय? पण ज्यांना संभ्रमच निर्माण करायचा आहे. धर्म, संस्कृती नाकारायची आहे त्यांना अशा प्रकारच्या विधानांचा आधार घेतल्याशिवाय पर्याय तरी कोणता? ज्या द्रमुकच्या मंत्र्याने हे विधान केले त्या द्रमुकच्या अन्य नेत्यांनी या पूर्वीही प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांचे (कु) पुत्र उदयनिधी स्टॅलिन यांनी तर 'हिंदू धर्म हा डेंग्यू, मलेरियासारखा असून तो संपविणे आवश्यक आहे.' असे चिड येणारे विधान केले होते. तर, ए. राजा नावाच्या नेत्याने हिंदू धर्माची तुलना एचआयव्ही आणि कुष्ठरोगाशी केली. हिंदू धर्म, संस्कृती ही मुळातच सहिष्णू आहे. त्यामुळेच धर्म, संस्कृतीविरोधात बरळणाऱ्यांचे फावते. ज्या देशात 'राम' प्रहरापासून दिवसाची सुरुवात होते. पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत तर उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत जिथे माणसांच्या नावात 'राम' आहे. एकमेकांना भेटल्यानंतर रामनामाचा घोष होतो आणि अनंताच्या प्रवासाला जातानाही 'रामनाम सत्य' असल्याचे जिथे स्मरण होते तिथे रामाच्या अस्तित्वाबाबत प्रश्न उपस्थित करणेच संतापजनक आहे. हिंदू सहिष्णू आहे, म्हणजे डरपोक आणि कमजोर असल्याचा समज या धर्मविरोधी नेत्यांचा झाला आहे. पण या राजकारण्यांचा जीव मतपेटीतील पोपटात असल्याची जाणीव आता हिंदूंनाही झाली असून योग्यवेळी या पोपटाची मान आवळण्यास हिंदू मागे-पुढे पाहणार नाहीत.

देशाच्या एका टोकावर असलेल्या तामिळनाडूतील घटनेबाबत संताप वाटत असतानाच मुंबईतील धारावी येथे घडलेल्या एका घटनेने मन प्रक्षुब्ध झाले. अरविंद वैश्य या २२ वर्षीय तरुणाची धर्मांधांनी निर्घृण हत्या केली. एक भांडण सोडविण्याचे निमित्त या हत्येला कारणीभूत असले, तरी तो संघाचा स्वयंसेवक, बजरंग दलाचा कार्यकर्ता आहे म्हणून ही हत्या झाल्याचे बोलले जाते. पोलिसांसमक्ष ही हत्या करण्यात आली. एवढेच नव्हे, तर दुसऱ्या दिवशी त्याच्या अन्त्ययात्रेवर धर्मांधांनी दगडफेक केली. पोलिसांनी यावेळी हस्तक्षेप केला. मोठा बंदोबस्त तेथे लावण्यात आला होता. पण मुळात कोवळ्या वयातील अरविंद यांनी तेथे अतिक्रमण, लव्ह जिहाद यासारख्या विषयांसाठी पुढाकार घेतल्याने त्यांना जीव गमवावा लागला. एकीकडे कोटी-कोटी हिंदूंचे आराध्य असलेल्या प्रभू श्रीरामांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह लावणारे कुटिल राजकारणी तर दुसरीकडे धर्माभिमान बाळगून चुकीच्या बाबी समाजात होऊ न देण्यासाठी लढणारे धारावीतील अरविंद वैश्य या दोनही घटना राष्ट्रभक्त नागरिकांच्या मनात चिंतेचे काहूर उठविणाऱ्या आहेत. हिंदूंचा सहिष्णू भाव हे बलस्थान असले, तरी हिंदुत्व टिकवून राहण्यासाठी योग्य व आवश्यक प्रसंगी संवैधानिक पद्धतीने संघटित शक्तीद्वारे चोख उत्तर देण्याची वेळ आता आली आहे. ■

९४२२८६२४८४

दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

महाराष्ट्राची निवडणूक भाजपासाठी महत्त्वाची

येत्या दोन-तीन महिन्यांत हरयाणा आणि झारखंडसोबत महाराष्ट्र विधानसभेचीही निवडणूक होणार आहे. हरयाणा आणि झारखंड विधानसभेच्या जवळपास तिप्पट जागा महाराष्ट्र विधानसभेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुकीला वेगळे राजकीय महत्त्व आहे. हरयाणा आणि झारखंडमधील निवडणुकीच्या निकालाचा देशाच्या राजकारणावर जेवढा परिणाम होणार नाही, त्याच्या कितीतरी पट परिणाम महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुकीकडे सगळ्या देशाचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाला अपेक्षित यश मिळू न शकल्याने यावेळची विधानसभा निवडणूक भाजपाने आपल्यासाठी प्रतिष्ठेची केली आहे. 'करो वा मरो' म्हणून भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. निवडणूक होणार असलेल्या प्रत्येक राज्यासाठी भाजपातर्फे निवडणूक प्रभारी नियुक्त केला जात असतो. त्याप्रमाणे भाजपाने हरयाणा, झारखंडसोबत महाराष्ट्रासाठीही निवडणूक प्रभारी आणि सहप्रभारी नियुक्त केले आहेत. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव महाराष्ट्राचे प्रभारी आहेत, तर दुसरे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव सहप्रभारी आहेत. मुळात भूपेंद्र यादव आपल्या संघटन कौशल्यासाठी ओळखले जातात. सनदी अधिकारी राहिल्यामुळे अश्विनी वैष्णव यांना संघटनेच्या कामाचा फारसा अनुभव नसला, तरी गेल्या काही वर्षांत भाजपाच्या संपर्कात आल्यानंतर त्यांनी संघटनशास्त्राचा चांगला अभ्यास केला. यादव आणि वैष्णव यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाचा बारीक अभ्यास केला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक प्रांताची आणि मतदारसंघाची माहिती या दोघांनी करून घेतली आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात आणि मतदारसंघात जाण्याचे नियोजन यादव आणि वैष्णव यांनी केले आहे. विशेष म्हणजे संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपताच भूपेंद्र यादव आणि अश्विनी वैष्णव पुढील तीन महिने महाराष्ट्रातच तळ ठोकणार आहे. महाराष्ट्रात महायुतीला सत्तारूढ करूनच दिल्लीत परतणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाने महाराष्ट्रातील भाजपाच्या नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये एकप्रकारचे शैथिल्य आले आहे. हे शैथिल्य दूर करून कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा उत्साह निर्माण करून त्यांना जिद्दीने कामाला लावण्याचे मोठे आव्हान या दोघांसमोर आहे.

महाराष्ट्राचे राजकारण गेल्या काही वर्षांत आघाड्यांचे राजकारण झाले आहे. भाजपा, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे राज्यातील चार प्रमुख पक्ष आहेत. हे चार पक्ष दोन आघाड्यांत विभागले गेले आहेत. भाजपा आणि शिवसेना यांची हिंदुत्ववादी आघाडी तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची धर्मनिरपेक्ष आघाडी. गेल्या कित्येक वर्षांत या चार पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढवली नाही. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत अपवाद म्हणून असा प्रयोग काही प्रमाणात झाला होता. भाजपा आणि शिवसेना यांच्या युतीचा दोन्ही पक्षांना चांगला फायदा झाला. आतापर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेना मोठा भाऊ तर भाजपा लहान भाऊ होता. आता मात्र परिस्थिती बदलली आहे. भाजपा मोठा भाऊ झाला तर शिवसेना लहान भाऊ. त्यातच लहान भावाच्या म्हणजे शिवसेनेच्या घरात भाऊबंदकी उफाळून आली. एका घराची दोन घरं झाली. शिवसेनेत एका घराची दोन घरं होण्याची ही पहिली घटना नाही तर याआधीही राज ठाकरे यांनी शिवसेना सोडत आपली वेगळी चूल मांडली होती. पण राज ठाकरेंची महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळी चूल पेटू शकली नाही. त्यामुळे त्यांना सत्तेची पोळी वा भाकरी आपल्या चुलीवर शेकता आली नाही. भाऊबंदकीच्या लागणीतून धर्मनिरपेक्ष आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसही वाचू शकली झाली. शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमधून त्यांच्या पुतण्याने वेगळा मार्ग पत्करला. साऱ्या जगाला कात्रजचा घाट दाखवणाऱ्या आपल्या काकाला म्हणजे शरद पवारांना अजित पवार यांनी कात्रजचा घाट दाखवला. त्यामुळे यावेळची महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक दोन आघाड्यांमध्ये होणार असली तरी आघाड्यातील राजकीय पक्षांची संख्या चारवरून सहावर गेली आहे. हिंदुत्ववादी आघाडीत भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट विरुद्ध काँग्रेस, शिवसेना उबाठा गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्यात होणार आहे. या दोन प्रमुख आघाड्यांशिवाय अन्य छोट्या-मोठ्या आघाड्याही विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात राहणार आहेत.

मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी केली आहे. जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवली तरी त्याचा महायुतीवर फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही. कारण जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवली नाही तर त्यांची मतं महाविकास आघाडीकडे जाऊ शकतात आणि त्यांनी निवडणूक लढवली तर त्यांची मते महाविकास आघाडीकडे न जाता त्यांनी उभ्या केलेल्या उमेदवारांकडे जातील. म्हणजे जरांगे पाटील यांच्या निवडणूक लढवण्याच्या निर्णयाचा फटका महायुतीला नाही तर महाविकास आघाडीला बसणार आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत २८८ मतदारसंघांतही आपले उमेदवार उभे करायला हरकत नाही. उलट त्यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला तर त्यांचा फटका लोकसभा निवडणुकीत बसला तसा पुन्हा एकदा महायुतीला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकसभा निवडणुकीच्या निकालामुळे महाविकास आघाडीचे मनोबल काही प्रमाणात उंचावले असले, तरी आता महायुतीही लोकसभा निवडणुकीच्या पराभवाच्या धक्क्यातून बऱ्यापैकी सावरली आहे. याचे श्रेय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना द्यावे लागेल. राज्यातील महायुतीच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आणि देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार हे दोन उपमुख्यमंत्री असले, तरी या तिघांमधील ऐक्य अफलातून आहे. या तिन्ही न

बदनापूर-अंबड विधानसभा डॉ.संजय पगारे लडविणार; आमदार कुचेंचे टेन्शन वाढणार

तभा वृत्तसेवा
भोकरदन/युवराज पगारे

आगामी बदनापूर अंबड विधानसभा निवडणुकीत मातंग बौद्ध समाजाचे डॉक्टर संजय पगारे यांना विधानसभा निवडणुकीत उमेदवारी देण्याचे मातंग बौद्ध समाजाने जाहीर केल्याने आमदार नारायण कुचे यांचे टेन्शन वाढणार अंबड भोकरदन बदनापूर विधानसभेच्या २०२४ च्या निवडणुकीच्या अनुषंगाने बदनापूर येथे बौद्ध व मातंग समाजाच्या सर्व राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी बदनापूर येथे एल्गार पत्रकार परिषद पार पडली, बदनापूर अंबड विधानसभा निवडणुकीमध्ये एससी आरक्षण सुटलेले असतानाही देखील इतर पक्ष आम्हाला उमेदवारी देत नाही आणि आमचे या विधानसभा मतदारसंघात एकूण ७२ हजार मतदान आहे,त्यामुळे या बैठकीत सर्वानुमते उमेदवार जाहीर करण्यात आला असून शिव,फुले, शाहू, आंबेडकर व अण्णाभाऊ साठे या थोर महापुरुषांच्या पुरोगामी विचारांचे उच्चशिक्षित अभ्यासू व कृतिशील व्यक्तिमत्त्व असलेले डॉक्टर संजय पगारे यांना बदनापूर विधानसभा निवडणुकीत आमदारकीसाठी उमेदवारी देण्याचे जाहीर करण्यात आले आहे,

दरम्यान डॉक्टर संजय पगारे यांचा जन्म भोकरदन तालुक्यातील विरेगाव येथे झाला असून त्यांचे शिक्षण एम, बी एस, एस, एम, डी.स्त्री रोग तज्ञ झाले असून त्यांनी औरंगाबाद येथील शासकीय रुग्णालय घाटी येथे हजारो रुग्णांची सेवा केली असून मात्र आता आपल्या समाजातील गोरगरिबांना न्याय देण्यासाठी त्यांनी समाजकार्याची आपल्या पालखी खांद्यावर घेतली आहे,

दरम्यान बदनापूर येथे पत्रकार परिषदे घेऊन सर्व बौद्ध समाज व मातंग समाजांना कळविण्यात आले, बदनापूर तालुक्यामध्ये घरोघरी जाऊन तसेच पत्रकार परिषद व मिळावे घेऊन आम्ही सर्व बौद्ध मातंग बांधवांनी बदनापूर अंबड विधानसभेमध्ये एससी समाजातून गेल्या तीन टर्म पासून एससी समाजाला सुटलेला आहे, तरी सुद्धा प्रस्थापित पक्षानी मागासवर्गीयाचा विचार केला नाही, दलित समाजाच्या बौद्ध व मातंग समाजाचा विचार केलेला नाही, त्या कारणाने सर्व मातंग व बौद्ध समाजाचा असं म्हणणं आहे की आमचं बदनापूर तालुक्यामध्ये एससी समाजाच ७२ हजार मतदान आहे,इतकं मतदान असून देखील आमच्या समाजावर अन्याय होत आहे, बाहेरून आयात केलेले लोक यांना चालतात या प्रस्तावित पक्षांना आमचा मातंग बौद्ध समाजाचा उमेदवार चालत नाही त्यांना त्यामुळे आम्ही या निवडणुकीमध्ये बौद्ध समाजाचा तरुण उमेदवार उभा करणार आहे, समोरच्या कोणत्याही पक्षाने किंवा महाविकास आघाडीने उमेदवार टाकला तर त्याला आम्ही आमचे मतदान करणार नाही असा एक मुखाने या एल्गार परिषद मध्ये निर्णय झाला आहे, याप्रसंगी डॉक्टर संजय पगारे, सुरेश खंडागळे,अनिल चौतमाल, भाऊसाहेब काकडे,कैलास पाजके, बाबासाहेब सोनवणे, सुभाष मगरे,अनिल उगले, संतोष शेळके,गौतम गायकवाड,कचरू रेगुडे, मिलिंद रगडे यांच्यासह समाजातील कार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यशवंत ग्राम समृद्धी योजनेतील रक्कम पतीच्या नावे उचलली!

देवडे हादगावच्या ग्रामपंचायत सदस्य अपात्र

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

यशवंत ग्राम समृद्धी योजनेच्या खात्यातील रक्कम पतीच्या नावे उचलून पदाचा दुरूपयोग केल्या प्रकरणी देवडे हादगाव ता.घनसावंगी येथील निर्मला अंकुश देवडे यांचे ग्रामपंचायत सदस्य पद जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्र ठरवले आहे.

जानेवारी - २०२१ मध्ये देवडे हादगाव च्या ग्रामपंचायत सदस्य पदी निर्मला अंकुश देवडे यांची निवड झाली होती. त्यांनी पदाचा गैरवापर करत यशवंत ग्राम समृद्धी योजनेच्या खात्यातील ३,००० रूपये रक्कम उचलून आर्थिक लाभ घेतल्या बाबत अण्णा बॉस देवडे, श्रीराम देवडे व सिद्धेश्वर देवडे यांनी ड. विलास भुतेकर यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांच्या न्यायालयात विवाद अर्ज दाखल केला होता. जिल्हाधिकाऱ्यां समक्ष झालेल्या सुनावणी दरम्यान ड.विलास भुतेकर यांनी सक्षमपणे बाजू मांडताना ग्रामपंचायत सदस्या निर्मला देवडे यांनी पदाचा दुरूपयोग करत यशवंत ग्राम समृद्धी योजनेच्या खात्यातून पतीच्या नावे दि. २७ ऑगस्ट २०२१ रोजी ३,००० रूपये उचलून सदरील रकमेचा स्वतःस आणि कुटुंबियांना आर्थिक लाभ करून घेतला. असल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ , कलम १४ (ग) चे उल्लंघन केल्याची बाब ड. विलास भुतेकर यांनी पुराव्यानिशी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सादर झालेले पुरावे, आणि ग्रामपंचायत च्या महाराष्ट्र बँक घनसावंगी शाखेतील खाते उतारा यांचे अवलोकन करून निर्मला अंकुश देवडे यांचे सदस्यत्व रद्द ठरवले. अर्जदारांच्या वतीने ड.विलास भुतेकर यांनी बाजू मांडली.

सिरसवाडीत ७४ लक्ष रुपयांच्या विकास कामांचे उद्घाटन

मुख्यमंत्र्यांनी ग्रामीण भागाचा कायापालट केला -माजीमंत्री अर्जुनराव खोतकर

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

शाश्वत विकासासाठी जलसिंचनाच्या सुविधा, शेतमाल बाजारपेठेपर्यंत नेण्यासाठी शिवार रस्ते, शेती पंपांची वीज बिल माफी, उत्पादन वाढीसाठी मूल्य साखळी विकास योजना, शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांतिकारक बदलाकरिता मुख्यमंत्र्यांनी लोककल्याणकारी योजनांद्वारे ग्रामीण भागाचा चौफेर कायापालट केला. असे प्रतिपादन शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी आज केले.

सिरसवाडी (ता. जालना) येथे सिमेंट रस्ता, शाळा इमारत बांधकाम , भूमिगत नाली, पेवर ब्लॉक बसवणे, सौर ऊर्जा पथदिवे, अशा ७४ लक्ष रुपये किमतीच्या विविध विकास कामांचे उद्घाटन गुरुवारी (ता. ०८) माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर ,उपजिल्हाप्रमुख संतोष मोहीते, अल्पसंख्यांक जिल्हा प्रमुख शेख जावेद,माजी सभापती पांडुरंग डोंगरे, तालुका प्रमुख भगवान अंभोरे ,युवा सेना तालुका प्रमुख राहुल गवारे ,तालुका सचिव रवींद्र ढगे,मा.पचायत समिती सदस्य जनार्धन चौधरी,सरपंच सौ. सुमित्रा ढगे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे, ज्ञानेश्वर (माऊली) उबाळे ,जफर खान,सरपंच बाळासाहेब पाचारणे, सरपंच विठ्ठल गवारे,उपसरपंच ज्ञानेश्वर ढवळे, हरेश पठाण, सुमित वाघमारे , रमेश काटकर, संदीप म्हस्के,दिनेश वाहुळ, लक्ष्मण अवघड ,ज्ञानेश्वर सुपारकर ,कैलास शिंदे,प्रविण जगताप आदींची उपस्थिती होती. माजी मंत्री खोतकर याप्रसंगी म्हणाले, गावाच्या विकासाची तळमळ असलेल्या रवींद्र ढगे यांनी आपल्याकडे धडक विहिरी, रस्ते व अन्य विकास कामांबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला .मुख्यमंत्र्यांनी गाव आणि शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून विकास कामे मंजूर केली.तथापि कापूस , सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादन वाढीकरिता खरीप हंगामात बॅटरी संचलित फवारणी पंपाचा पुरवठा केला जाणार असून शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी असे आवाहन खोतकर यांनी केले.

युवा सेना तालुका सचिव रवींद्र ढगे यावेळी म्हणाले की, पदावर नसतांनाही माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या प्रयत्नांमुळे सिरसवाडीत २६ धडक विहीरी मंजूर झाल्या, कब्रस्तान येथे पेव्हर ब्लॉक,गावात अंतर्गत रस्ते अशी भरीव विकासकामे करण्यात आली.याची जाणीव ठेवून ग्रामस्थांनी येत्या निवडणुकीत खोतकर यांच्या पाठीशी भरभक्कम पणे उभे रहावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास महिला, तरुण, व पंचक्रोशीतील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रसंगी माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवत किशोर वाघमारे, सतीश वाघमारे, भारत वाहुळकर ,गौतम वाहुळकर, कृष्णा ठोंबरे ,अरुण ढिल्पे ,सुदर्शन वाघमारे ,सुरेंद्र गायकवाड ,संदीप हिवाळे, विजय हिवाळे, संतोष हिवाळे, मुकेश हिवाळे, बबन म्हस्के, सुरेश हिवाळे यांच्या सह असंख्य युवकांनी शिवसेनेत प्रवेश केला .त्यांचे खोतकर यांनी स्वागत केले.

साकळगावच्या जनतेनी केला परिवर्तनाचा निर्धार

शाखा उद्घाटन सोहळा: सतीश घाटगे पाटलांच्या सभेस मोठा प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

अंबड घनसावंगी: तालुक्यातील गावागावांत समृध्दी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे हे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वातावरण ढवळून काढत आहे. रविवारी साकळगावात भारतीय जनता पार्टीच्या १६२ व्या शाखेचा उदघाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास गावातील जनतेनी मोठा प्रतिसाद मिळाला.

तळागाळातील प्रत्येक घटकाच्या कल्याणासाठी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते समर्पण वृत्तीने काम करत असल्याने गावागावात सर्व घटकातील जनता भाजपसोबत जुडत आहे. येणाऱ्या काळात घनसावंगी विधानसभेत परिवर्तन निश्चित होणार, असा विश्वास सतीश घाटगे यांनी याप्रसंगी बोलताना दिला.

साकळगावातील शाखा उदघाटन प्रसंगी असंख्य युवक व ज्येष्ठ कार्यकत्र्यांनी भाजप मध्ये जाहीर प्रवेश केला. नूतन शाखेतील सर्व पदाधिकारी, सदस्यांसह भारतीय जनता पार्टीत प्रवेश केलेल्या सर्वांचे सतीश घाटगे यांनी पक्षात स्वागत करून सत्कार केला. यावेळी कामगार विभागाचे जिल्हाध्यक्ष, गोविंद आर्दड, विकास शिंदे, माधव टेहळे, ज्ञानेश्वर काळे, रामेश्वर गरड,भगवान तौर, हनुमान आर्दड,किसन कोरडे, गणेश कोरडे,राम साबळे, विकास साबळे, शाखाध्यक्ष रमेश जाधव, राजेभाऊ देशमुख, भिमराव जाधव, नामदेव वाघमारे,विशंभर चव्हाण, सुदाम धोत्रे, विष्णुपंत गाडेकर,संतोष वाळके,रोहित मुळे अशोक गाडेकर, संतोष हरदास, बालाजी काकडे, भागवत खाडे, नानाभाऊ शिकारे, रोहित मुळे, बाबासाहेब वाघमारे, पिनू भले, रामदास धोत्रे, रामजी मोगरे, दत्ता माने, श्याम काळे, सुभाष पांढरे, ज्ञानेश्वर नाईकनवरे, सतीश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

संक्षिप्त

महसूल पंधरवडा दिनानिमित्त दाखल्यांचे वाटप

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

जाफ्राबाद तालुक्यात महसूल पंधरवडा दिनानिमित्त शासकीय विविध दाखले मौजे ,शिंदी येथे मा.डॉ.सारिका भगत यांच्या हस्थे शिबिर लाहून तात्काळ सर्व शासकीय दाखले वितरित करण्यात आले. जाफराबाद तालुक्यातील खेड्यापाड्यातील अपंग व्यक्तींना देखील प्रमाण पत्र देण्यात आले आहे.तसेच सरपंच सौ.केसरबाई जंजाळ, अव्वल कारकुन धनराज भुते, मंडळ अधिकारी, आर.कांबळे, तलाठी.के.जी.राजपूत, महसूल सहायक -कृष्णा फुलमाळी तसेच महसूल सहायक -देवकाते सह जाफ्राबाद तालुक्यातील शेतकरी वर्ग तसेच शाळेतील विद्यार्थी वय वयोवृद्ध महिला अपंग व्यक्तींच्या सहभाग होता.

रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्युट (मार्टी) ची स्थापना करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

आज परतूर येथे युवक जिल्हाध्यक्ष कपिल भैय्या आकात यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार,अल्पसंख्यांक विभाग,परतूर च्या वतीने मौलाना आझाद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्युट(मार्टी) ची स्थापना करण्यात यावी असे निवेदन मा.उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले.यावेळी माजी नगराध्यक्ष विनायक आप्पा काळे,माजी नगरसेवक विजय नाना राखे,अल्पसंख्यांक राज्य सचिव अखिल काजी सर,सय्यद आरेफ अली,अल्पसंख्यांक राज्य महासचिव अखिल पठाण,लाला मिया बागवान,इफ्तेखार काजी,बाबासाहेब राऊत,सरपंच गणेश आंबेकर,इब्राहिम कायमखाणी,शाकेर पठाण,आण्णासाहेब खंडागळे,जावेद पठाण,वैजनाथ गवळी यांची उपस्थिती होती.

कोपर्डा येथे कर्जबाजारी पणाला कंटाळून गळफास घेवून शेतकऱ्याची आत्महत्या

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील कोपर्डा येथे कर्जबाजारी पणाला कंटाळून शेतकऱ्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना काल दिनांक ०७ ऑगस्ट २०२४ राजी रात्री १०:३० वाजेच्या सुमारास जाणावऱ्याच्या गोठ्यात दोरी च्या साहयाने गळफास घेतलेल्या अवस्थेत निदर्शनास आले. लक्ष्मण रामराव भांबीरे वय ६३ रा. कोपर्डा तालुका भोकरदन जि. जालना असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यानंतर नातेवाईकांनी त्यांना भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालय दाखल केले असता डॉकटर यांनी तपासून मृत्य घोषित केले. त्यांच्या मृत्य देहावर शवविच्छदन करून मृत्य देह नातेवाईकांच्या ताब्यात देणार आहे.कोपर्डा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे समजते.

त्यांच्या पच्यात पत्नी, एक मुलगा, २मुली, सुन असा परिवार आहे. दरम्यान, सतत नापिकी, दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असल्याने घेतलेले कर्ज कसे फेडणार या विवेचणे तुन लक्ष्मण भांबीरे यांनी आत्महत्या केल्याचे नातेवाईकांच्या वतीने सांगितले जात आहे.

या घेटनेचा पोलिस निरीक्षक किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉ. दादाराव बोर्डे,गोपाल सातवण, नंदकुमार दांडगे यांनी पंचनामा करून भोकरदन पोलिस ठाण्यात अकास्मित मुर्त्यूची नोंद घेण्यात आली आहे.

निसर्गाच्या शाळेत न्यू हायस्कूल वरुडच्या विद्यार्थ्यांनी केला आनंदोत्सव साजरा

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

आनंदाने न्हाऊन निघालेला श्रावण महिना आणि त्याच श्रावणाच्या हलक्याशा सरींनी आनंदाने ओलीचिंब झालेली आमची न्यू हायस्कूलची मुले बालकवींच्या श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे,क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडेया ओळींची आज आठवण आल्या वाचून राहिली नाही. आनंदाने भरलेल्या या श्रावण महिन्यात निसर्गही तेवढ्याच समरसतेने साथ देत आहे. त्या निसर्गाला जवळून पाहण्यासाठी आमच्या न्यू हायस्कूल वरुड घायवटची निसर्ग सहल पायी पायी ने थेट पोहोचली गोपी-सोनगिरी या गावच्या परिसरात असलेल्या परमपूज्य राघव गिरी महाराज यांनी स्थापन केलेल्या आश्रमा मागील हिरवाईने नटलेल्या वनामध्ये, जिकडे बघावे तिकडे अवघ्या निसर्ग टवटवीतपणात न्हाऊन निघालेला. अशा मनमोहक वातावरणात खरंतर चार भिंतीच्या आत मिळणाऱ्या शिक्षणापेक्षा खरे शिक्षण देणाऱ्या निसर्ग शाळेत विद्यार्थ्यांनी आज शिक्षणाचे अनेक धडे पूर्ण केले. जंगलातील विविध वनस्पती, त्यांचे मानवी जीवनातील महत्त्व, तळे, तळ्यात राहणारे जलजीव त्याचबरोबर पक्षी त्यांचा कानाला हवा हवासा वाटणारा आवाज. हे सगळं अनुभवत असतानाच. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेले कलाविष्कार सादर केले. कोणी आनंदात गाणी गायली, तर कुणी आपल्या वर्गाचा ग्रुप तयार करून नृत्यांची सादरीकरण केले. यामध्ये सोबत असलेले शिक्षकही मागे राहिले नाही. राहून राहून येणाऱ्या पावसाच्या हलक्याशा सरी त्यातच ऊन पावसाचा खेळ यात सर्व विद्यार्थी ओले चिंब झाले त्यामुळे तर विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला. सहल एवढ्यावरच थांबली नाही, तर येताना परमपूज्य राघवगिरी महाराज यांच्या आश्रमात तेथील भक्तांनी विद्यार्थ्यांसाठी बनवलेल्या खिचडी प्रसादाचा यथेच्छ आस्वाद घेतला. शेवटी बाबांनी त्यांच्या सुंदर अशा आवाजामध्ये विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील गीत त्याचबरोबर 'ए मेरे वतन के लोगो' आणि एक गवळण म्हणून दाखविली विद्यार्थ्यांना जीवनात कसे वागावे, कसे राहावे यावर आधारित थोडक्यात मार्गदर्शन केले, आणि या सुंदर अशा सहलीचा गोड समारोप झाला. या सहलीच्या आयोजन नियोजनामध्ये आणि यशस्वीरित्या पार पाडण्यामध्ये प्रशालेचे मा. मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षकांनी मनापासून कार्य केले त्या सर्वांचे आणि सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत काही शकुनी मामा मिठाचा खडा टाकू पाहत आहेत -आ.बबनराव लोणीकरांची विरोधकांवर टिका

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

परतूर विधानसभा मतदारसंघातील जवळपास दीडशे च्या वर गावांमध्ये पावसाळ्यामध्ये बैलगाडी जात नव्हती, मात्र आपण मंत्री झाल्यानंतर मतदारसंघातील ३०० गावांना डांबरीकरणाच्या रस्त्याने जोडले असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले

ते परतुर तालुक्यातील वलखेड येथे कंडारी वलखेड परतुर डांबरीकरण रस्ता व पुलाचे बांधकाम करणे (०७ कोटी रु),३९००० लिटर क्षमतेच्या जल कुंभाचे बांधकाम करणे तर पाटोदा येथे गणपती मंदिर ते बस स्टँड सिमेंट रस्ता बांधकाम करणे, गणपती मंदिरासमोर सभा मंडप बांधकाम करणे, ऐतिहासिक बार व दुरुस्ती करणे, दलित वस्ती अंतर्गत सभामंडप बांधकाम करणे, धनगर वस्ती अंतर्गत सभा मंडप बांधकाम करणे ०१ कोटी रु अशा एकूण आठ कोटी रुपये किमतीच्या कामाच्या भूमिपूजन समारंभ प्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की, परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये आपण वॉटर ग्रीन योजना कार्यान्वित केली मात्र, अधिकाऱ्यांनी कुठल्या गावात पाण्याचे टाकी आहे किंवा नाही याची शहानिशा केली नाही जिल्हा परिषदेत कडून यादी घेऊन प्रत्येक गावात पाणी टाकी असल्याचे कागदपत्रि दाखवून दिले, मात्र प्रत्यक्षात अतिशय पुरातन जुना झालेल्या पडलेल्या सांगाडा उरलेल्या पाण्याच्या टाक्या या वॉटर ग्रीन साठी उपयुक्त नव्हत्या त्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेत मतदार संघातील १२० गावांमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या माध्यमातून जलजीवन मिशन अंतर्गत १२० कोटी रुपयांचा निधी खेचून आणला असून सध्या मतदारसंघातील जवळपास ३० गावांमध्ये पाणी टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे ते त्या दिवाळीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचा आपला मानस असल्याचे यावेळी त्यांनी बोलून दाखवले

पुढे बोलताना ते म्हणाले की परतुर तालुक्यामधील ७००० विधवा वयोवृद्ध, दिव्यांगांना संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजनेच्या माध्यमातून मानधन सुरू करण्यात आपण यशस्वी झालो असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

गेल्या ३५ वर्षापासून राजकारण करत असताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची गंगा पोहोचवण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहिलो असून येणाऱ्या काळात आपण याच पद्धतीने समाज विकासासाठी काम करणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले, सामाजिक घटकांचा विकास करत असताना जात धर्म पंथ या सर्व गोष्टी बाजूला ठेवत आपण सर्वसामान्यांच्या विकासासाठी अहोरात्र झटत आलो असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघन कणसे, जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर, रंगनाथ येवले रवींद्र सोळंके नितीन जोगदंड प्रभाकर खंदारे, पुंडलिकराव डव्हारे विश्वनाथ सुरूंग,आसाराम सुरूंग, सखाराम सुरुंग तंटामुक्ती अध्यक्ष गंगाधर सुरुंग तुळशीदास खवल, लक्ष्मण शिंदे गणेश राव खवल रामकिसन आर्दड संभाजी शिंदे आत्माराम खवल, बबनराव खवल श्री गिरी माजी सरपंच वेढे दत्ताराव सुरुंग लक्ष्मण बील्हारे गजानन वाटाणे भागवत महाराज डव्हारे तहसीलदार प्रतिभा गोरे, गटविकास अधिकारी राजेश तांगडे, अभियंता श्री सग्रोळे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

पोलीस अधिक्षकपदी अविनाश बारगळ

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट

पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या जागी अविनाश बारगळ अमरावतीवरून येतं आहेत. बारगळ यांची अमरवतीतील कारकीर्द राज्यात चर्चेत राहणारी ठरलेली होती.नंदकुमार ठाकूर यांची बदली झाली असली तरी त्यांना नवीन ठिकाणी अजून नियुक्ती मिळालेली नाही.

बीडमध्ये नंदकुमार ठाकूर यांनी दोन वर्ष सेवा बजावल्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी अविनाश बारगळ बीडला येतं आहेत.बारगळ यांनी अमरवतीमध्ये चार वेळा पोलीस विभागात सेवा बजावली आहे.

अतिरिक्त पोलिस अधिक्षक त्यानंतर पोलिस उपायुक्त म्हणून अमरावती शहरात त्यांनी कार्यकाळ उपभोगल्यानंतर अमरावती पोलीस अधिक्षक आणि नंतर पुन्हा अमरावतीमध्येच सीआयडीचे अधीक्षक म्हणून गृहविभागाने त्यांना काम करण्याची संधी दिली होती. एकाच शहरात चार वेळा पोलीस दलात वेगवेगळ्या पदावर काम करणारे अधिकारी म्हणून बारगळ यांची राज्यात मोठी चर्चा झाली होती.आता ते अमरावतीच्या सीआयडी विभागातून बीडला पोलीस अधिक्षक म्हणून येतं आहेत.एक चांगला आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे.

बीड मतदारसंघात वीज वितरणासंबंधीचे सर्व सर्व विषय मार्गी लावा

आ. संदीप क्षीरसागरांची मागणी

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट

बीड मतदारसंघात वीज वितरणासंबंधीच्या असलेल्या नागरिक, शेतकरी यांच्यासाठी महत्वपूर्ण असलेले सर्व प्रलंबित व प्रस्तावित विषय मार्गी लावन्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. यामध्ये शेतकऱ्यांना शेतीपंपाचे नवीन वीज कनेक्शन जोडणी, विविध योजनेंतर्गत रोहित्र तसेच तत्सम साहित्य मागणीचे प्रस्तावांचा तात्काळ निपटारा वीज वितरण कंपनी कडून करण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुक्यातील वीज वितरणासंबंधी शेतकरी आणि नागरिकांच्या अनेक मागण्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पाली येथील मंजूर असलेल्या ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे अद्यापपर्यंत काम सुरु झालेले नाही. तसेच म्हाळसजवळा, नामलगाव, पिंपळवाडी, बेलुरा येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे कामही पूर्ण झालेले नाही. याबाबत परिसरातील गावातील नागरिक या उपकेंद्राचे काम पूर्ण करून सदरील उपकेंद्र लवकरात लवकर कार्यरत करावे अशी मागणी करत आहेत. बीड मतदारसंघात शेतकऱ्यांना नवीन वीज कनेक्शन तसेच नवीन रोहित्र देण्यात यावे. ज्याठिकाणी शेतीपंपासाठी नवीन वीज कनेक्शन देण्यात आले आहे, त्याठिकाणी ओव्हरलोड मुले रोहित्र जळण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. अशा ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. यासोबतच मतदारसंघातील विविध निकषपात्र ठिकाणांवर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या आर.डी.एस.एस. व एन.एस.सी. योजनेंतर्गत प्रातवित कामांना मंजुरी देऊन तात्काळ कामे पूर्ण करण्यात यावीत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी वीज वितरण कंपनीकडे केल्या आहेत.

३ लाख ५२ हजार ८८० लाभार्थ्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये जिल्ह्यातून अर्ज दाखल

९४.३४% अर्जांची छाननी करून स्वीकृती मोबाईल संदेश

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट

बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमध्ये अर्ज दाखल केले असून ९४.३४ % टक्के अर्जांची छाननी करून मोबाईलव्दारे स्वीकृती संदेश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये लाभार्थी महिलांची नोंदणी आणि अर्जाची पडताळणी करण्याची विशेष मोहीम जिल्हयात सुरू असून याअंतर्गत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी करून ३,३२,८९२ लाभार्थी महिलांच्या अर्जांना स्वीकृती देऊन मोबाईल संदेश पाठविण्यात आलेले असून आजपर्यंत ९४.३४ %टक्के काम झालेले आहे.

ज्यांचा ऑनलाईन अर्ज भरतांना कागदपत्राच्या बाबतीत काही त्रुट्या आढळून आले आहेत. त्यांच्या मोबाईलवर संदेश जात असून अश्या अर्जदार महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नारी शक्ती दूत पच्या माध्यमातून ज्या मोबाईल ऍप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल मधून अर्ज दुरूस्त (एडिट) करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या महिला अर्जदारांनी अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेले आहेत त्यांचे अर्ज स्वीकृती देण्यात येत आहे. व तसा संदेश महिला अर्जदारांच्या मोबाईलवर जात आहे. स्वीकृती (approved) असा संदेश आल्यास आपला अर्ज यशस्वीरिता भरला गेला असल्याचे कळते. तथापि ज्या महिला अर्जदारांना आपला अर्ज पार्शली रिजेक्टेड (partially rejected) असा मोबाईल संदेश आलेला आहे त्यांनी तात्काळ नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ऍप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल ऍप मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

बोगस वैद्यकीय व्यवसायीक आढळल्यास कडक कार्यवाही करण्यात येईल

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट

बोगस वैद्यकीय व्यवसायीक आढळल्यास कडक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे निर्देश आज झालेल्या बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीच्या जिल्हास्तरीय बैठकीत एकत्रितरीत्या घेण्यात आले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीची बैठक घेण्यात आली.या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, प्र.पोलीस उपअधीक्षक उमा शंकर कस्तुरे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एल. आर. तांदळे, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन आर.एम. बजाज, यांच्यासह समितीवरील सदस्य उपस्थित होते. जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीची स्थापना महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षक व औषधी द्रव्य विभाग निर्णय क्र.सीआयएम १०९९/ प्र.क्र.३५५/९९/ अधिनियम/दि. ०७/०२/२००० अन्वये गठित करण्यात आलेली आहे. या अंतर्गत बैठकीचे आयोजन करण्यात येते.झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर जिल्ह्यात आढळल्यास कडक कार्यवाही करण्यात येईल तसेच नागरीकांना अशी माहिती आढळल्यास त्यांनी प्रशासनाकडे ती दयावी. त्यावर योग्य ती नियमाप्रमाणे कार्यवाही करून माहिती गुप्त ठेवण्यात येईल.

आज 'घरो घरी तिरंगा' या उपक्रमातंर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मागील काही वर्षांपासून घरो घरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यातंर्गत उद्या शुक्रवारी तिरंगा रॅली चे आयोजन छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन करण्यात येत आहे.राज्यभर घरोघरी तिरंगा उपक्रम राबविण्यात येत असून या अतंर्गत बीडमध्ये शुक्रवारी सकाळी १०:३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन या उपक्रमाचा शुभारंभ होणार असून ही रॅली पुढे कारंजा-भाजीमंडई मार्ग-छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल यामार्गास जाणार आहे.

घरो घरी तिरंगा या उपक्रमाअंतर्गत तिरंगा रॅली , तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, तिरंगा सेल्फीज, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा असे उपक्रम राबविण्यात येणार आहे. या तिरंगा रॅलीमध्ये बीडच्या नागरीकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने किया केले आहे.

केज तालुक्यातील विहीरी व गायगोठा रक्कम जमा करा

अन्यथा के.पं.स.समोर आत्मदहन करणार - रोहन गलांडे पाटील

तभा वृत्तसेवा
केज दि.८ ऑगस्ट

केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून खोदलेल्या शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे सिंचन विहीर खोदण्यासाठीचे ४ लाख रुपये अनुदान व गायगोटा योजनेचे ७८ हजार अशा दोन्ही योजनेचे शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी व तात्काळ शासनाने द्यावी जर तात्काळ रक्कम देण्यात आली नाही तर केज पंचायत समिती समोर आत्मदहन करणार आहे असा इशारा शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दीला आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून केज तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे शासन कागदोपत्री प्रक्रिया ज्या लाभार्थांची पुर्ण झाली आहे व केज तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी मनरेगा जलसिंचन विहीर योजनेचे लाभार्थी आहेत लाभार्थांन कडील शासन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे परंतु अद्याप पर्यंत लाभार्थ्यांना मनरेगा योजने अंतर्गत झालेल्या विहीरीचा ऐकही रुपये रक्कम देण्यात आलेली नाही चार - पाच महिने झाले केज तालुक्यातील विहीर लाभार्थी शेतकरी मनरेगा विहीर योजने अंतर्गत ४ लाख अनुदान मिळणार म्हणून व्याजाचे पैसे काढून विहीरीला खर्च करून विहीर खोदल्या आहेत परंतु शासना कडुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीची ४ लाख रुपये रक्कमेतील ऐक रुपये शेतकऱ्यांच्या , लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेला नाही तरी शासनाने केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीचे ४ लाख अनुदान व गायगोठा योजनेचे ७८ हजार शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी,अनुदान शासन कागदोपत्री प्रीक्रीया तात्काळ पुर्ण करुन लाभार्थ्यांच्या बँक खात्यात तात्काळ जमा करावे अन्यथा अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील केज पंचायत समिती समोर आत्मदहन करण्याचा शासनाला इशारा रोहन गलांडे यांनी निवेदनाद्वारे दीला आहे.

जलसिंचन विहीर लाभार्थी यांची बीले पास होऊन दोन महीने झाले आहेत तरी शासनाकडून निधी आलेला नाही.ग्राम रोजगार सेवक संघटना केज तालुका सचिव अनिल घोडके.

प्रा.सुरेखा निगुळे होळकर यांना पीएच.डी. पदवी प्रदान

तभा वृत्तसेवा
केज दि.८ ऑगस्ट

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहिवासी प्रा. सुरेखा निंगुळे होळकर यांना १८ मार्च २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. प्राध्यापक सुरेखा ह्या सख्या सिद्धांत इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मैनेजमेंट पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रातील संस्थांमध्ये महिलांचे नेतृत्व विकास व ग्रामीण भागामध्ये स्त्रियांचे महत्व अनन्यसाधारण वाढत आहे, यासंदर्भात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वाणिज्य व व्यवसाय विभागातील मानव संसाधन व्यवस्थापन यामध्ये डॉ. सुरेखा निंगुळे यानी पुणे जिल्ह्यातील गावच्या विकासावर महिलांच्या नेतृत्वाचा प्रभाव (Impact of women leadership in development of villages in Pune. district) हा संशोधन प्रबंध विद्यापीठाला सादर केला. पासाठी डॉ. अनिता खटके यांनी मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे नेकील वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲड रिसर्च पुणे येथील संशोधन प्रमुख डॉक्टर आनंद दडस यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या या यशाबद्दल डॉ. सुरेखा यांचे सिद्धांत महाविद्यालयाचे संस्थापक

अध्यक्ष आर. एस. यादव, उपाध्यक्ष सिद्धांत यादव, उपाध्यक्षा याशिका यादव, संचालक एस. जी. वाळके, सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सन्मान करून अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल मावळ व पुणे परिसरातून त्याच्यावर कोतुकाचा वर्षाव होत आहे.

त्यांच्या या यशामागे त्यांचे पती श्री. सुरेश निंगुळे, मुलगा स्वरीत निंगुळे, देवांश निगुळे यांचा मोलाचा वाटा आहे. तांच्या मोठ्या भगिनी डॉ. आशालता भारजकर यांना सुद्धा काही दिवसापूर्वी पीएच डी पदवी प्रदान झालेली आहे. दोघी बहिणी पीएच. डी. झाल्याबद्दल व्हांनी आपल्या आई रुक्मिणी जगन्नाथ होळकर व वडील जगनाथ होळकर यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

सुरेश नामदेव निगुळे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

तभा वृत्तसेवा
केज दि.८ ऑगस्ट

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहिवासी श्री. सुरेश नामदेव निंगुळे याना १ ऑगस्ट २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. श्री. सुरेश नामदेव निंगुळे हे सध्या प्रादेशिक व्यवसाय व्यवस्थापक म्हणून खाजगी कंपनी मध्ये पुणे येथे कार्यरत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वाणिज्य व व्यवसाय विभागातील मानव संसाधन व्यवस्थापन यामध्ये डॉ. सुरेश नामदेव निंगुळे यांनी 'पुणे प्रदेशातील श्वसन औषधांच्या संदर्भात औषय उद्योगाच्या विपणन पद्धतीचे सखोल विश्लेषण (- Critical -nalysis of Marketing Practices of the Pharmaceutical Industry Concerning Respiratory Medicine In Pune Region) हा संशोधन प्रबंध विद्यापीठाला सादर केला. यासाठी डॉ. सचिन बोरगावे, डायरेक्टर, प्रतिभा इन्स्टिटयूट ऑफ बिजनस मॅनेजमेंट, पुणे यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या या पशाबद्दल डॉ सुरेश यांचे मोठे बंधू श्री मधुकर निगुळे, श्री. भारत निंगुळे, छोटी बहीण सौ. अनुराधा भास्कर लांडगे व सर्व सहकारी यांनी सन्मान करून अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल पुणे परिसर व त्यांच्या मुळ गावातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

त्यांच्या या यशामध्ये त्यांच्या पत्नी डॉ. सुरेखा सुरेश निंगुळे, मुलगा स्वरीत निंगुळे, देवांश निंगुळे यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या पत्नी डॉ. सुरेखा सुरेश निंगुळे यांना सुद्धा काही दिवसापूर्वी पीएच. डी पदवी प्रदान झालेली आहे.

औद्योगिक वसाहत निर्मितीच्या मार्गावर अंबाजोगाईची वाटचाल सुरु

प्रकल्प जमिनीच्या समतल सर्वेक्षण आणि सिमांकनासाठी निघाली निविदा

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.८ ऑगस्ट

अंबाजोगाईकरांसाठी बहुप्रतीक्षित आणि शहर विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या शासकीय औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) निर्मितीच्या दृष्टीने आ. नमिता मुंदडा यांच्या आग्रही पाठपुराव्यानंतर शासन पातळीवर वेगाने हालचाली सुरु आहेत. लवकरच अंबाजोगाई 'एमआयडीसी'साठी काळवटी तांडा परिसरात समतल सर्वेक्षण आणि सिमांकन करण्यात येणार असून या कामाची निविदा देखील प्रकाशित झाली आहे.

अंबाजोगाई शहराचा विकास झपाट्याने होत असल्याने व या ठिकाणी बहुतांश जिल्हास्तरीय सर्व कार्यालय कार्यरत आहेत. या ठिकाणी सहकारी साखर कारखाना, सुतगिरण्या, कृषी उत्पादनावर आधारीत प्रक्रिया उद्योग, सहकारी बँका, पतसंस्था, आरोग्य विषयक सुविधा, कुशल मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्याच प्रमाणे शहरापासून लातूर येथील विमानतळ जवळ असून परळी, घाटनांदुर, लातूर येथील रेल्वे स्टेशनही जवळच आहेत. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकदारांच्या दृष्टीने अंबाजोगाई हे शहर सोयीचे आहे. शहरालगत मोठ्या प्रमाणावर गायरान, मोकळ्या जागा उपलब्ध आहेत. त्यामुळे या ठिकाणी एमआयडीसी प्रकल्प उभारणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रकल्पामुळे या भागातील सुशिक्षीत, बेरोजगारांच्या हाताला रोजगार मिळवून उद्योजकांना मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. व अंबाजोगाई येथे तातडीने एमआयडीसी व्हावी यासाठी आ.नमिता मुंदडा पुढाकार घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रधान सचिव उद्योग विभाग यांच्याकडे एमआयडीसी अंतर्गत अंबाजोगाई येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मंजूरी द्यावी अशी विनंती केली होती. तसेच, या बाबत आ. मुंदडा यांनी महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव, भूसंपादन विभागाचे महाव्यवस्थापक आणि व्यवस्थापक तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावाही केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नाला यश आले आणि काळवटी तांडा परिसरातील जागा 'एमआयडीसी'साठी निश्चित करण्यात आली. हा भाग डोंगराळ असल्याने याचे समतल सर्वेक्षण करून सिमांकन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून निविदा देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही प्रक्रिया अंबाजोगाई 'एमआयडीसी' निर्मितीतील महत्वाचा टप्पा असणार आहे. यानिमित्ताने शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या अंबाजोगाई शहर औद्योगिक शहर बनण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु केली आहे. एमआयडीसी मुळे या भागातील बेरोजगारांना रोजगार मिळेल व उद्योजकांना चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्ती करून आ.नमिता मुंदडा यांनी या बाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या डॉ.प्रितमताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

स्व.डॉ. विमलताई मुंदडा यांनीही केला होता प्रयत्न

अंबाजोगाईत एमआयडीसी व्हावी म्हणून दिवंगत मंत्री स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांनी सन २००४ मध्ये वरवटी येथे पंचतारांकित एमआयडीसी मंजूर केली होती. त्यासाठी गायरान व शेतकर्यांची जमीन संपादन करणे आवश्यक होते. परंतु, शेतकर्यांनीह विरोध केल्याने सदर प्रकल्पासाठी जागा उपलब्ध झाली नाही. त्यांचे अपूर्ण स्वप्न आत त्यांच्या स्नुषा आ.. नमिता यांच्या माध्यमातून पूर्ण होण्याची चिन्हे आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

विरोधकांच्या फेक नरेटीव्हला सडेतोड उत्तर द्या- चिखलीकर

आगामी विधानसभेसाठी भाजपने कंबर सकली, विकासकामांसह योजनांची माहीती देणार जनतेपर्यंत देणार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ ऑगस्ट

काँग्रेस पक्षाला लोकसभेत केवळ ९९ जागा मिळाल्या भाजपला २४० जागा मिळाल्या. काँग्रेस पक्ष ९९ जागा मिळाल्यानंतर जल्लोष साजरा करीत आहे. जणूकाही फार मोठा विजय मिळाल्याचे काँग्रेस भासवत आहे. वास्तविक देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्याचा मान नरेंद्र मोदी यांना मिळाला. देशातील जनतेने पंतप्रधान मोदी यांना तिसऱ्यांदा संधी दिली. ही आपल्यासाठी गौरवाची, अभिमानीची गोष्ट आहे. देशातील गोर-गरीब, शेतकरी, शेतमजूर, महिला यांच्यासाठी अनेक महत्वाकांक्षी योजना राबवल्या. त्याचा थेट लाभ त्यांना मिळाला आणि मिळत आहे. विरोधक केवळ फेक नरेटीव्ह तयार करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. भाजपच्या प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विरोधकांच्या फेक नरेटीव्हचा पर्दाफाश करून जनतेपर्यंत वास्तविकता पोहचविण्याचे काम केले पाहीजे. दुसरीकडे राज्य सरकारने विकासाचे कामांसोबतच अनेक महत्वाकांक्षी योजना राबवल्या आहेत. याचा प्रचार आणि प्रसार करण्यात जोमाने केल्यास आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप, महायुतीचा झेंडा निश्चितच फडकणार असल्याचा विश्वास माजी खा प्रताप पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला.

हिंगोली येथे भारतीय जनता पक्षाची जिल्हा विस्तारित बैठक व अधिवेशन शहरातील सुखदा मंगल कार्यालय येथे पार पडले. यावेळी प्रताप पाटील चिखलीकर यांनी जिल्हा विस्तारित बैठकीला मार्गदर्शन करताना नुकत्याच

झालेल्या लोकसभा निवडणूक झालेल्या चुका पुन्हा होणार नाही. याची दक्षता घेण्याचे आवाहन करीत केंद्र आणि राज्य सरकारने केलेली विकास कामे व योजना सांगण्यात नेते, कार्यकर्ते कमी पडले. त्याचा फायदा विरोधी पक्षाने घेतला. आता नेत्याने व कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेऊन गावागावांत जाऊन योजना व पक्षाने केलेले विकास कामे सांगावीत. विरोधकांच्या फेक नरेटीव्हला सडेतोड उत्तर द्यावे, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आळस झटकून कामाला लागण्याच्या सूचना यावेळी चिखलीकर यांनी दिल्या.

यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी बोलतांना मागील दहा वर्षाच्या काळात हिंगोली विधानसभा मतदारसंघात राष्ट्रीय महामार्ग, पंतप्रधान ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, तलाव, सिंचनाची कामे तसेच आमदार निधीतून विविध ठिकाणी रस्ते, सामाजिक सभागृह तसेच केलेल्या विकासाच्या कामांचा उल्लेख करीत देशात एनडीएचे सरकार असून राज्यातही महायुतीचेच सरकार येणार असल्याचा दावा केला. राज्यातील सरकारने महिलांसाठी बस तिकीटात अर्धा, ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत बसप्रवास, शौचालये, घरकुले, गॅस सिलेंडर, मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजना, शेतकऱ्यांसाठी विविध योजना, १ रूपयांत पीकविमा आदी महत्वाकांक्षी योजना प्रभावीपणे राबवल्या आहेत. विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नसल्यामुळे केवळ भाजपला बदनाम करण्यासाठी सोशल मिडीयाच्या माध्यमातून भ्रम पसरविण्याचे काम केले जात आहे. काँग्रेस, शरदचंद्र पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष, उध्दव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना यांनी देशात आणि राज्यात विकासाची कामे केली नाहीत. अडीच वर्ष मुख्यमंत्री असतांना घरात बसून सरकार चालविले. शेतकऱ्यांना वरदान ठरणाऱ्या योजना बंद करण्याचे काम केले तसेच सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षण टिकवण्यात उध्दव ठाकरे यांचे सरकार अपयशी ठरले. आमच्या सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले. मराठा आरक्षणासाठी मागासवर्ग आयोग तयार करून मराठा समाजाचे एकाच वेळी राज्यात सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करण्याचे काम विद्यमान राज्य सरकारने केले. विरोधकांनी केवळ मराठ्यांच्या मतांचे आजपर्यंत राजकारण केले त्यामुळे त्यांना आरक्षणाबद्दल बोलण्याचा मुळीच अधिकार नाही. दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम विरोधक करीत आहेत. त्यांच्या भूलथापांना बळी न पडता भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आक्रमकपणे केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व जाती धर्मासाठी राबविलेल्या योजनांची, विकास कामांची माहीती जनतेपर्यंत पोहचवावी, असे आवाहन आ. मुटकुळे यांनी केले.

यावेळी भाजपचे लोकसभा प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर यांनी बोलतांना सांगितले की, केंद्र आणि राज्य सरकारने शेतकरी सन्मान निधीची रक्कम १२ हजार केली. सर्वसामान्यांसाठी आयुष्मान भारत योजना, शेतकऱ्यांसाठी अनेक योजना, गोरगरीबांसाठी घरकुल, शौचालये, पुढील पाच वर्षापर्यंम गोरगरीबांना मोफत अन्न धान्य योजना, महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवून लखपती दिदी बनवले. सबका साथ, सबका विश्वास आणि सबका विश्वास हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून केंद्र आणि राज्य सरकार काम करीत आहे. अटल सेतूख समृध्दी महामार्ग, मेट्रो यांच्या माध्यमातून देशात रेल्वे आणि रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याचे काम सरकारने केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये भाजप, महायुती पुन्हा सत्तेवर येणार असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी मराठवाडा संघटन मंत्री संजय कोडगे,आ तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी खा ॲड शिवाजीराव माने, माजी आमदार रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, खोब्राजी नरवाडे, महिला जिल्हाध्यक्षा उज्ज्वला तांभाळे, छाया मरडे, भाजप नेते श्रीकांत देशपांडे, युवा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण, शहराध्यक्ष कैलाशचंद्र काबरा, उद्योग आघाडीचे प्रदेश सदस्य मिलिंद यांबल, माजी नगराध्यक्ष शिवदास बोड्डेवार, अनिता सूर्यतळ, सुभाष लदनिया, पांडुरंग पाटील, दुर्गादास साकळे, के के शिंदे, प्रशांत सोनी, आशिष वाजपेयी, राजू यादव, उमेश गुट्टे, जयदीप देशमुख, सुनीता मुळे, ज्योती वाघमारे, नंदाताई इंगळे, अलका लोंखडे, हमीद प्यारेवाले, माणिक लोडे, संदीप वाकडे, संतोष टेकाळे

औंढा तालुक्यात दिवसाढवळ्या चार गावात घरफोडी, पोलिसांचे पथक आरोपीच्या शोधात

तभा वृत्तसेवा
औंढा नागनाथ, ८ ऑगस्ट

तालुक्यातील गोजेगाव, हिवरखेडासह चार गावांमध्ये एकाच दिवशी घरफोडी करत लाखोंचा ऐवज लुटून चोरटे विना क्रमांकाच्या दुचाकीवरून पसार झाल्याची घटना बुधवारी दुपारी दोन ते साडेतीन वाजेच्या दरम्यान घडली विशेष म्हणजे तिन्ही ठिकाणी घरफोडी करणारे एकच असल्याची माहिती मिळत आहे. सीसीटीव्हीच्या फुटेज वरून पोलीस अधिकारी तपास करीत आहेत.

पावसाने उघडीप दिल्यामुळे सध्या शेतीत निंदनी, खुरपण व फवारणीचे काम जोमाने सुरू असल्याने व शेती मशाल गतीकरिता मजूर मिळत नसल्याने घरातील सर्वच लोक आपापल्या शेतात राबत आहेत. सदरची बाब हेरून नेमका याच गोष्टीचा गैरफायदा घेत नागनाथ तालुक्यातील गोजेगाव, येळी व हिवरखेडा येथे चोरट्यांनी भर दुपारी दोन ते चार वाजे

दरम्यान घरफोडी करीत लाखो रुपयाचा ऐवज लुटला सदर घटनेची माहिती मिळताच औंढा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, पोलीस उपनिरीक्षक किशोर पोट, जमादार संदीप टाक गजानन गिरी यांच्यासह तात्काळ धाव घेतली. दरम्यान अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील याही घटनास्थळी दाखल झाल्या. सदर चोरटे गोजेगाव येथून घरफोडी करून विना नंबरच्या मोटरसायकलवरून पसार होताना एकाने व्हिडिओ रेकॉर्डिंग केली असून औंढा पोलीस त्यांच्या मागावर आहेत. गोजेगाव येथे दुपारी दोन वाजेच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या तीन चोरट्यांनी गंगाधर गणपतराव सांगळे यांच्या घरात कुलूप तोडून प्रवेश केला येथून तीन तोळ्याची पोत व एकदानी असा चार तोळ्याचा ऐवज लंपास केला त्यानंतर सचिन भानुदास सांगळे यांच्या घरातील महिलांचे दहा तोळ्यात सोन्याचे दागिने लांबविले.

दरम्यान इतर दोन ते तीन घरांचे दार उघडण्याचा प्रयत्न केला गोजेगाव येथील घरफोडी नंतर चोरट्यांनी मोर्चा येथून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या येळी गावाकडे वळवला येळी गावामध्ये दाखल होत त्यांनी राजू वैद्यनाथ सांगळे यांच्या घराचे कुलूप तोडून दोन तोळे सोन्याचे दागिने व नगदी रक्कम पळविले त्यानंतर आपला मोर्चा पुन्हा हिवर खेड्याकडे वळविला व हिवरखेडा इथूनही काही ऐवज व हिवरखेडा तेही काही ऐवजाची लूट केली. सर्व गावे मुख्य रस्त्यावरच असल्याने चोरट्यांना पळून जाण्यात यश आले. दरम्यान पोलीस प्रशासनाकडून सदर प्रकरणी कसून चौकशी करण्यात येत आहे. चोरट्यांबाबत जनतेला सतर्क राहण्याच्या सूचना केल्या असून सदर प्रकरणी हिंगोली जिल्हा पोलीस प्रशासनाकडून जनतेने सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले असून गावामधून कोणी अनोळखी विना नंबर युनिकॉन गाडीवरून आल्यास किंवा दिलेल्या वर्णनासारखी व्यक्ती आढळून आल्यास त्वरित पोलीस प्रशासनास संपर्क करण्याचे आवाहन केले आहे. सदर प्रकरणी सतीश भानुदाससांगळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद झाला असून पुढील प्रकरणाचा तपास पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नागरे हे करीत आहेत.

संक्षिप्त वृत्त

बांग्लादेशात अपत्य, नातेवाईक असलेल्यांसाठी संपर्क क्रमांक जाहीर

हिंगोली- बांग्लादेशातील उफाळलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्ह्यातील नागरिक अडचणीत असतील, त्यांच्या परिवाराने व पालकांनी जिल्हाधिकारी कार्यलयाशी ९४०५४०८९३९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करून माहिती देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी केले आहे. बांग्लादेशात स्थानिक कारणांमुळे हिंसाचार उफाळला आहे. महाराष्ट्रातून बांग्लादेशमध्ये व्यापार, शिक्षण इत्यादी कारणाने जे नागरीक गेले आहेत त्यांना देखील हिंसाचाराचा फटका बसला असल्याची शक्यता आहे. यामुळे जिल्हाधिकारी परदेशी यांनी हे आवाहन केले आहे.

ठक्करबाप्पा योजनेचे प्रस्ताव सादर करण्यासाठी ३० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

हिंगोली- ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सुचनेनुसार सन २०२२-२३ या वर्षापासून योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सन २०२४-२५ साठीचे ठक्कर बाप्पा योजनेचे जिल्हास्तर व राज्यस्तर प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. ३१ जुलै, २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. प्राप्त प्रस्तावांची संख्या पाहता या योजनेचे प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. ३० ऑगस्ट, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. हिंगोली व परभणी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी त्यांच्या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या ग्रामपंचायतनिहाय दि. ३ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयातील विवरणपत्र एक मध्ये नमूद विविध कामांपैकी आर्थिक मर्यादेच्या अनुषंगाने कामांचा प्राधान्यक्रम ठरवून विविध कामांचे प्रस्ताव तयार करुन कामाच्या दाजपत्रकासह प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी येथे दि. ३० ऑगस्ट, २०२४ पूर्वी सादर करण्यात यावे, असे आवाहन प्रकल्प अधिकारी यांनी केले आहे.

औंढा तालुक्यातील युवक-युवतीसाठी फूड प्रोसेसिंगचे मोफत प्रशिक्षण

हिंगोली- जिल्हा उद्योग केंद्र व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने औंढा नागनाथ तालुक्यातील सर्वसाधारण प्रवर्गातील युवक, युवती व महिलासाठी फूड प्रोसेसिंगचे मोफत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी उमेदवार हा किमान आठवी पास असावा, वय १८ ते ४५ असावे. यासाठी आधार कार्ड, पासपोर्ट फोटो, टीसी, बँक पासबूक जमा करुन फूड प्रोसेसिंग प्रशिक्षणासाठी दि. ८ ऑगस्ट, २०२४ पर्यंत आपली नाव नोंदणी करावी. नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी सिध्दार्थ थोरात (९५५२१८३०३८) कार्यक्रम समन्वयक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपर्क साधावा.

हिंगोली विधानसभेसाठी बंडू कुटे यांना उमेदवारी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ ऑगस्ट

आगामी विधानसभा निवडणुकीया पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यख राज ठाकरे यांचे हिंगोलीत आगमन होताच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जेसीबी मधून फुलांचा वर्षाव करीत जंगी स्वागत केले. यावेळी राज ठाकरे यांनी मनसेचे जिल्हाध्यक्ष बंडू उर्फ प्रमोद कुटे यांना हिंगोली विधानसभेसाठी उमेदवार म्हणून घोषणा केली. राज ठाकरे सध्या मराठवाड्याच्या दौऱ्यावर असून दि ८ ऑगस्ट रोजी हिंगोली येथे आले असता त्यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला यावेळी मोठ्या संख्येने मनसेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

कुस्ती स्पर्धेत दराडे विद्यालयाचे तीन मल्ल प्रथम

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ ऑगस्ट

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे श्रीमती शांताबाई दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत घावघवित यश संपादन केले आहे. नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते त्यापैकी अभिषेक काशिनाथ सावळे या विद्यार्थ्याने १७ वर्ष वयोगटात ६५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला तसेच त्याने ग्रिको प्रकारात सुद्धा प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. तसेच दुसरा विद्यार्थी नामदेव ज्ञानेश्वर पोले याने सुद्धा दुहेरी यश संपादन केले आहे. नामदेव ग्रीको प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला असून ४१ ते ४५ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक संपादन करून शाळेचे नाव रौशन केले आहे. क्रीडा अध्यापक श्री. अनिल लोळेवार सर यांनी या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. शाळेतील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा देण्याचे काम या शाळेचे मुख्याध्यपक डॉ. प्रकाश अंभोरे सातत्याने करत असतात. तसेच शाळेचे उप मुख्याध्यापक श्री. जितेंद्र भट्ट, पर्यवेक्षक श्री. तुलशी चीलमुल यांचेही मार्गदर्शन व प्रेरणा यशस्वी मुलांना असते. या यशाबद्दल भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे सचिव ॲड गयबाराव नाईक, अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, संचालक ॲड. केशवराव शिरसाट व पंडितराव बांगर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

मोंढ्यात ६ हजार क्विंटल हळद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ ऑगस्ट

येथील संत नामदेव मार्केट यार्डमध्ये बुधवारी सुमारे सहा हजार क्विंटल हळदीची आवक झाली आहे. बुधवारी सकाळपासूनच हिंगोली सह परभणी, वाशिम आदी ठिकाणाहून मोठ्या संख्येने वाहनांमधून शेतकऱ्यांनी हळद विक्रीसाठी आणली होती. यावेळी कृउबा समितीसमोर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी कृउबा समितीच्या संचालकांनी बैठक घेवून निर्णय घेतले. हळदीला प्रतिक्विंटल १५५०० ते १३ हजार एवढा भाव मिळाला आहे. गुरूवारपर्यंत हळदीचा लिलाव सुरूच राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गटशेतीची कास धरून कृषी उत्पन्न वाढवावे- जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ ऑगस्ट

शेतकऱ्यांनी नियमितपणे माती परीक्षण करून खत व्यवस्थापन करावे. हिंगोली जिल्हा हा हळद उत्पादनामध्ये प्रसिद्ध असून, शेतकऱ्यांना हळदीपासून तयार होणारे विविध पदार्थ तयार करावे. तसेच शेतकऱ्यांनी गटशेतीची कास धरून कृषि उत्पन्न वाढवावे, असे आवाहन ऑनलाईन माध्यमाद्वारे मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी गट शेती करून शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करावी. तसेच नवीन योजनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा व लाडकी बहीण योजनेमध्ये सर्व महिलांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले.

संत नामदेव सेवाभावी संस्था, हिंगोली संचलित कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर जि. हिंगोली, महसूल विभाग, आणि कृषी विभाग, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने महसूल पंधरवाडानिमित्त आयोजित कृषि मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रमात आवाहन केले. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. पी. पी. शेळके, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, तर दूरदृष्यप्रणालीद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी उपस्थित होते. कृषि, महसूल विभाग व जिल्ह्यातील इतर विभागासोबत के. वी. के. नियमितपणे विस्तार कार्य तसेच शेतकऱ्यांचे शंकांचे निरसन करत आहे. सोबतच विविध माध्यमांचा वापर करून नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचत असल्याचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शेळके यांनी मत व्यक्त केले. प्रास्ताविकात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी जिल्ह्याम ध्ये शेतकऱ्यांची पेरणी झाली असून यावर्षी दहा हजार हेक्टर हळदीचे क्षेत्र जिल्ह्यात वाढलेले आहे. सोबतच हळद संशोधन केंद्र वसमत येथे ३२ विविध हळदीच्या जाती लागवड केल्या असून आपल्या हळदीला भौगोलिक मानांकन मिळालेला आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी झएऊ या वेबसाईटवर जाऊन आपली नोंदणी करावी, असे आवाहन केले. तसेच, शेतकरी बांधवांनी सोयाबीन, तूर, कापूस, उडीद, हळद व तर विषयांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन नियमितपणे घेण्याचे आवाहन केले. सोबतच शेतकरी बंधूंनी फवारणी करताना काळजी घ्यावी. कृषि विभागांतर्गत स्मार्ट योजना, परंपरागत कृषि विकास योजना अंतर्गत गांडूळ खत विक्री व उत्पादन जीवामृत, दशपर्णी अर्क असे प्रशिक्षण घेऊन शेतकऱ्यांनी स्वत:चा उद्योग सुरू करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात संत नामदेव सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष शिवाजी माने, मृदा विज्ञानचे विशेषज्ञ साईनाथ खरात, कृषि विद्याचे विशेषज्ञ राजेश भालेराव, पिक संरक्षण विशेषज्ञ अजयकुमार सुगावे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महेंद्र माने, नितीन घुगे, तालुका कृषी अधिकारी कळमनुरी, के. एच. बोथीकर, श्रीरंग निंबाळकर, प्राचार्य डॉ. विष्णू बोंढारे, यांच्यासह तलाठी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक, कृषि सेवक, महसूल विभागाचे कर्मचारी, शेतकरी बांधव व विद्यार्थी मोठ्य संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन अनिल ओळंबे व डॉ. अतुल मुराई यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.daiktarunbharat.com

भोकरमधील जिल्हा अधिवेशनाला अल्प प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
भोकर, ८ ऑगस्ट -

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनूषंगाने भाजपा कडून नांदेड जिल्हा अधिवेशन घेण्यात आले मात्र भाऊ च्या ढिसाळ नियोजनामूळे अनेक कार्यकर्ते नाराज झाले तर भोकर येथे पार पडलेल्या नांदेड जिल्हा अधिवेशनाकडे अनेकांनी पाठ फिरवली. परिणामी सभागृहातील अनेक खुर्च्या रिकाम्याच दिसून आल्याचे चित्र पहावयास मिळाले.

विधानसभा निवडणुका जाहीर होण्याचे संकेत प्राप्त होताच सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चे बांधणी सुरू केली असून भोकर विधानसभा मतदारसंघात अशोक चव्हाण यांच्या माध्यमातून भाजपाकडून श्रीजया चव्हाण यांना प्रमोट करण्याचा खटाटोप सुरू झाला असुन याच पार्श्वभूमीवर दिनांक ४ ऑगस्ट रोजी येथील ओम लॉन्स येथे हदगाव मुदखेड किनवट माहूर हदगाव आदी तालुक्यातील कार्यकर्त्यांशी सुसंवाद साधण्यासाठी जिल्हास्तरीय अधिवेशन घेण्यात आले. खा.अशोक चव्हाण खा.अजित गोपछडे आमदार केराम वगळता कुठल्याही बड्या नेत्यांनी या अधिवेशनात हजेरी लावली नाही माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांचीही अनुपस्थिती या निमित्ताने चर्चे चा विषय ठरला या कार्यक्रमाचे सर्व सूत्र भाऊनी सांभाळले असल्याची माहिती प्राप्त होते. राजूरकर यांनी पक्षातील व गाव खेड्यातील कार्यकर्त्यांशी सुसंवाद न साधता'कार्यक्रमाला न आल्यास बघून घेऊ' असे धमकीवजा आव्हान केल्याने बहुतांश कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली त्याचाच परिपाक की काय सदर जिल्हा अधिवेशनाला अल्प प्रतिसाद दिसून आला.

खा.चव्हाण साहेबांना अधिवेशन स्थळी पोहचण्यास तब्बल तीन तास विलंब झाल्याने अर्धवट कार्यक्रमातुन लोकांनी माघारी परतण्यास सुरवात केली होती .लोक माघारी जातांना व खुर्च्या रिकाम्या होत असल्याचे पाहुन भाऊनी स्टेजवरुन खाली उतरत बाहेर येऊन लोकांना कार्यक्रम होईपर्यंत थांबण्याची विनंती करत होते. या वेळी मानधनाच्या बोलीवर ग्रामीण भागातून आणण्यात आलेल्या काही गावातील वैतागलेल्या लोकांनी साहेब चार तासासाठी आणले होते, आता वेळ संपली, थांबायचे असेल तर ओव्हर टाईम द्या तरच असा हट्ट धरला होता.

श्रीजया चव्हाण यांना प्रमोट करण्यासाठी वाडी तांड्यावर प्रचार आघाडीवर सुरू असताना प्रचाराचे रिमोट भाऊ च्या हातात दिल्यास येणाऱ्या काळात त्याचा जबरदस्त फटका श्रिजया ताई यांच्या विजयावर पडणार आहे म्हणून खा.अशोक चव्हानांना आता तरी भाऊना आवरनेच खरे आव्हान तयार झाले आहे.भोकर तालुक्यात भाऊ ची लुडबुड थांबवणे गरजेचे असल्याची चर्चा होत असून भाजपातील सर्वांनाच विश्वासात नाही घेतल्यास लोकसभेची पुनरावृत्ती होऊ शकते असे मानले जात आहे.

तेलंगना राज्याप्रमाणे शेतकरी यांना कर्जमुक्ती व खरीप हंगामा च्या पेरणी अगोदर आर्थिक मद्त करा अन्यथा उपोषण : शिंदे

तभा वृत्तसेवा
उमरी, ८ ऑगस्ट -

उमरी तालुक्यातील लाडक्या बळीराजा कर्जबाजारी भावाला कर्जमुक्त करुन शेजारील तेलंगणा राज्याप्रमाणे येथिल बळीराजा भावाला खरिप हंगामात पेरणी अगोदर प्रती एकर(क्षेत्र अमर्यादित) विस हजार रुपयाचे आर्थिक मद्त करा अशी मागणी उमरी माजी शिवसेना प्रमुख तथा माजी समन्यवय सामती अध्यक्ष साहेबराव पाटील शिंदे यांनी केली आहे .

निवेदनात साहेबराव पाटील शिंदे म्हणाले बळीराजावर नैसर्गिक संकटांना सातत्याने सामोरे जावे लागते कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ सतत पाऊस पडत असल्यांने पिकांना रोगाच्या प्रार्दुभावामूळे नुकसान सोसावे लागते मुलांचे शिक्षण ,आरोग्य,लग्न, बँकेच्या कर्जाचे परतफेड वेळेत होत नसल्यांने बळीराजाला आत्महत्या शिवाय दुसरा पर्यायच नसल्यामूळे अखेर कर्जबाजारी पणाला कंटाळूण बळीराजा जिवन यात्रा संपवतो शासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वतंत्र्य दिना निमित्त गुरुवार दिनांक १५ऑगस्ट २०२४ रोज उमरी तहसिल कार्यालया समोर बेमुदत लाक्षणिक उपोषणास बसत असल्याचे निवेदन शिवसेना उध्दवजी बाळासाहेब ठाकरे गटाचे निष्ठावंत कडवट शिवसैनिक साहेबराव पाटील शिंन्दे यांनी दिला आहे . बेमुदत उपोषणाच्या मागचा

या प्रमाणे महात्मा गांधी नरेगा योजनेतून सिंचन विहीरीसाठी क्षेत्र पाच हैक्टर पर्यंत बळीराजांना मंजूरी द्यावी ,सर्व बँकेमार्फत बळीराजांना कर्ज मंजूरीसाठी सिबील स्कोरची अट शिथिल करून पिकांवर कर्ज रक्कम देण्याऐवजी बँकेला बळीराजांने शेती भांडवलासाठी मागेल तेवढे कर्ज स्थानिक बँक शाखेत मंजूरी देणे, राज्य मार्ग ड.क.थ.- २५१ उमरी - भोकर (मौ.सोमठाणा / शिरुर)रस्त्यालगत (सौर ऊर्जा) विद्युत खांबे विना परवाना उभे करित असून मुख्यरस्त्याच्या किमान कमीत कमी ५० मिटर किंवा १००मिटर अंतरावर उभे करायला हवे होते झथऊ च्या सां.बां.विभाग अधिका-यांना हाताशी धरुन चिरेमिरे देऊन विद्यूत खांबे उभे करण्यात आले आहे ते जून महिन्या मध्ये वादळी वा-याने ती खांबे मुख्यरस्त्याच्त्रा मध्मभागी पडून मुख्यरस्ता बंद झाला जिल्हाधिकारी अभिजीत राउत व स्थानिक तहसिलदार ,पोलीस निरीक्षक यांच्या आदेशाने रस्त्यात पडलेले खांबे तातडीने बाजूला करण्यात आले मानव जिवित हाणी टाळण्यासाठी पुन्हा विद्यूत खांबे उभे केलेले रद् करण्यात यावे संबधीतावर गुत्तेदार उच्चीत कार्यवाही करण्यात यावी ,उमरी शहरालगत सरकारी जमिन गट क्रं. १८० क्षेत्र ६: ७९ आर तळ्याच्या जागेवरती मुस्लीम स्मशानभुमीची तटरक्षक भिंत बांधकाम केल्यांने आपल्या विभागीय कार्यालया भुमी अभिलेखा मार्फत जागेची मोजणी करुन तळ्याच्या जागेवरती अतिक्रमणमुक्त करून बांधकाम केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करणे, उमरी नगर परिषद हद्दीत मुख्यरस्ते व चौका चौकात सि.सि.टी.व्ही.कॅमेरे बसून गुन्हेगारीला चाप बसण्यासाठी पोलीस प्रशासनाला मद्दत होईल त्या प्रमाणे कॅमेरे बसविण्यात यावे , सन २०२३ पीक विमा इफकोटोकीया कंपनीने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे केलेल्या बळीराजांना पीक विमा मंजूर करून तातडीने खात्यात जमा करावे अशा या विविध मागण्या संदर्भात विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादासजी दानवे, विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी,तहसिलदार,मुख्याधिरी नगर परिषद,पोलीस निरिक्षक,यांना निवेदना व्दारे कळविले आहे उमरी तालुक्यातील पुन्हा साहेबराव शिंदे यांनी बळीराजांना असे नम्र अवाहन केले आहे की सदर मागण्या संदर्भात शेतकरी वर्ग जास्ती जास्त संख्येने आपल्या न्याय हक्कासाठी बेमुदत लाक्षणीक उपोषणाला उपस्थित रहावे असे अव्हाण केले आहे . या वेळी बेमुदत उपोषण स्थळी साहेबराव पाटील शिंदे या सोबत ,दादाराव पाटील पूयड,कैलास पाटील हातनिकर,अशोक पाटील जोगदंड,बाबुराव पाटील भुत्ते,राजू पांचाळ,दिगांबर ईंगळे आदी शिवसैनिक शेतकरी उपस्थित राहणार आहेत

संक्षिप्त वृत्त

माजी जि.प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

नवीनर नांदेड - नांदेड दक्षिण मतदार संघातील वाजेगाव सर्कल चे माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे हे दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी खासदार वसंतराव चव्हाण व आमदार मोहनराव हंबर्डे यांच्या उपस्थितीत पुन्ह काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यामुळे दक्षिण मतदार संघातील काँग्रेस कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. नांदेड लोकसभा २०२४ च्या निवडणुका पूर्वी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्याबरोबर माझी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी भाजपामध्ये पक्षप्रवेश केला होता. सदरील पक्षांच्या जाचक अटीमुळे व तेथील कार्यप्रणाली आपणास व्यवस्थित वाटली नसल्यामुळे आपण पुन्हा काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करण्याचा निश्चय केला दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी नांदेड जिल्ह्याचे खासदार वसंतराव चव्हाण व दक्षिण मतदार संघाचे आमदार मोहनराव हंबर्डे यांच्या उपस्थितीमध्ये काँग्रेस पक्षात प्रवेश केला. भाजपातील एकेरी कार्यप्रणाली मुळे आपणास जनतेची सेवा करता येत नसल्यामुळे आपण आपल्या स्वघरी परतण्याचा निश्चय करून दिनांक ७ ऑगस्ट रोजी पुन्हा काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. मनोहर पाटील शिंदे यांच्या काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याबद्दल दक्षिण मतदार संघात काँग्रेस पक्षाला बळकटी मिळणार हे निश्चित असल्याचे दिसून येते. व त्यांच्या प्रवेशामुळे मतदारसंघातील पक्षांचे कार्यकर्तेही उत्साही झाले.

किनवट विधानसभा निवडणुक प्रमुख पदी बाबुराव केंद्रे

किनवट - आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाणे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ओबीची आघाडीचे नांदेड

जिल्हाध्यक्ष बाबुराव केंद्रे यांची किनवट विधानसभा निवडणूक प्रमुख म्हणुन नियुक्ती केली असून दि ७ ऑगष्ट रोजी लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात बाबुराव केंद्रे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहे. आगामी विधानससभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने किनवट मतदार संघात जोरदार तयारी सुरू केली असून त्या दृष्टीने पक्षश्रेष्ठिने ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाबुराव केंद्रे यांची किनवट विधानसभा निवडणूक प्रमुख म्हूणन नियुक्ती केली आहे. आ. भीमराव केराम यांच्या शिफरसीवरून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संघटनात्मक नियुक्तीची घोषणा केली असून दि ७ ऑगस्ट रोजी किनवट येथील पक्षाच्या लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या हस्ते व आ भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत बाबुराव केंद्रे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. विद्यार्थी दशेपासून बाबुराव केंद्रे हे पक्षात एकनिष्ठपणे सक्रिय कार्यकर्ते म्हणून काम करत आले आहेत यापूर्वी त्यांनी किनवट तालुका अध्यक्ष म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावली असून सद्या ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष म्हणुन कार्यरत आहेत. पक्षनिष्ठा, दांडगा जनसंपर्क,उत्तम वक्तृत्वशैली तसेच संघटनात्मक कार्याच्या बळावर बाबुराव केंद्रे यांनी पक्षात अढळ स्थान निर्माण केले.आमदार भीमराव केराम यांचे ते अत्यंत विश्वास व खंदेसमर्थक म्हणून ओळखले जातात.मागील निवडणुकीत बाबुराव केंद्रे यांच्या नियोजनबद्ध प्रचार व रणनीतीचा पक्षाला मोठा फायदा झाला असल्याने पक्षश्रेष्टीने त्यांच्यावर निवडणूक प्रमुखची जबाबदारी दिल्याचे समजते. भारतीय जनता पक्ष हा विशाल महासागर आहे. निष्ठेने काम करणाऱ्या प्रत्येकाला पक्षाच्या उच्च पदावर काम करण्याची संधी मिळते. निस्वार्थ भावनेने मी गोरगरिब जनतेसाठी संघर्ष करत आलो. प्रत्येक वेळी पक्षाने माझ्या कार्याची दखल घेतली.राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,पंकजाताई मुंडे, श्रीकांत भारतीय, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या आदेशानुसार तसेच किनवट विधानसभेचे कार्यतत्पर आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन विधानसभा निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकून दाखवणार अशा प्रतिक्रिया बाबुराव केंद्रे यांनी नियुक्तीनंतर दिल्या आहेत. या नियुक्तीबद्दल भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्याकडून बाबुराव केंद्रे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जी.के. एनर्जीचा झी २४ तास कडून सन्मान

तभा वृत्तसेवा
नांदेड, ८ ऑगस्ट -

कृषी क्षेत्रातील कार्याबद्दल जी. के. एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे संस्थापक गोपाल काबरा व संचालक मेहुल शहा यांचा मुंबई येथे झी २४ तास एका कार्यक्रमात राज्याचे मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

नांदेडची भूमिपुत्र असलेल्या गोपाल काबरा यांनी जी.के.एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. सौरऊर्जेच्या माध्यमातून ते जिल्ह्यासह राज्यभरातील शेतकऱ्यापर्यंत पोहोचले असून मागील काही वर्षापासून कार्य सुरू आहे. प्रधानमंत्री कुसुम योजना अंतर्गत जी.के.एनर्जी महाराष्ट्रातील नंबर एक सोलार पंप कंपनी बनली आहे. या कार्याची दखल घेत झी२४तास च्या वतीने जीके एनर्जी कंपनीचे संस्थापक गोपाल काबरा व संचालक मेहुल शहा यांचा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. हा सन्मान मिळाल्याबद्दल मुख्य प्रकल्प अधिकारी अंकुश जाधव, प्रकल्प व्यवस्थापक शशिकांत शिंदे, बालासाहेब कराड यांच्यासह विराज टीमचे भागवत मुधोळ, दिनेश मुधोळ, सोपान मुधोळ, सचिन मुधोळ, श्रीकांत मुधोळ, सुमित मुधोळ, शुभम मेंडके, दिनेश पारवेकर, दत्ता मुधोळ, गोविंद मुधोळ आदींनी अभिनंदन केले आहे.

काँग्रेसची आजपासून भोकर मतदारसंघात जनसंवाद यात्रा

तभा वृत्तसेवा
नांदेड, ८ ऑगस्ट -

काँग्रेसचा भोकर गड मजबूत ठेवण्यासाठी काँग्रेसने जोरदार तयारी सुरू केली असून उद्या दिनांक ९ ऑगस्ट पासून भोकर मतदार संघात जनसंवाद यात्रा काढण्यात येणार आहे. सत्य गणपती मंदिरापासून या यात्रेची सुरुवात होणार असून यात्रा मतदारसंघातील सर्व गावे वाडी तांड्यावर पोहोचणार आहे.

भोकर मतदार संघात ३२४ बूथ आहेत.उद्या जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून अप्रत्यक्षरीत्या प्रचाराला सुरुवात करण्यात येणार आहे. खासदार वसंत चव्हाण यांच्या हस्ते यात्रेचे उद्घाटन तर अध्यक्षस्थानी काँग्रेसचे अध्यक्ष बि. आर. कदम हे राहणार आहेत. या जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून काँग्रेस पक्षाकडून इच्छुक असलेले सर्व उमेदवार पक्षाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचविणार आहेत

खासदार अशोक चव्हाण यांचे आव्हान नाहीच

भोकर मतदारसंघात खासदार अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण निवडणूक लढवणार असण्याची चर्चा आहे. त्यामुळे काँग्रेसच्या उमेदवारासमोर मोठे आव्हान असल्याची चर्चा होत आहे. परंतु खा. अशोक चव्हाण यांचे भोकर मतदार संघात कुठलेही आव्हान नसल्याचा दावा माजी सभापती बाळासाहेब रावणगावकर यांनी केला आहे. राज्यात अनेक मुख्य मुख्यमंत्री होऊन गेले त्यांचा निवडणुकीत काही परिणाम झाला नाही. त्यातच भोकर मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे या मतदारसंघात काँग्रेसचा उमेदवार निवडून येणार असल्याचे निश्चित आहे अशी प्रतिक्रिया माजी सभापती बाळासाहेब रावणगावकर यांनी दिली.

विज कामगार सोसायटीच्या अध्यक्षपदी वाघमारे

तभा वृत्तसेवा
नांदेड, ८ ऑगस्ट -

नांदेड महावितरणच्या वीज कामगार सोसायटीच्या अध्यक्षपदी सतीश वाघमारे तर सचिव पदी ईश्वर सिंग टेलर यांची निवड करण्यात आली या निवडीबद्दल वर्कस फेडरेशनच्या वतीने अध्यक्ष व सचिवाचा व संचालक मंडळाचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्यात वीज कामगार सोसायटीचे प्रभारी अध्यक्ष महेश वाघमारे तर नवनियुक्त अध्यक्ष सतीश वाघमारे ,सचिव ईश्वर सिंग टेलर, संचालक कैलास राऊत, राजेश सोनकांबळे राजनंदिनी सोनकांबळे, डीबी गोत्राम, बालाजी स्वामी रामगिरवार , वर्कस फेडरेशनचे नेते एम आर जाधव , केंद्रीय सदस्य पंडित तेलंग, केंद्रीय सल्लागार एन एम.स्वामी, कामगार नेते विजय रणखांब ,झोनसचीव संजय टाक,मंडळ अध्यक्ष मोईनभाई, मंडळ सचिव बालाजी सकरगे , उपाध्यक्ष उद्धव बंडेवाड, शंकर खिसे पाटील ,देगावे, गंगाधर रेडस व अन्य सर्व संघटनेचे पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

आ. श्यामसुंदर शिंदे यांनी विविध विकास कामांच्या माध्यमातून मतदारसंघाचा कायापालट केला: आशाताई शिंदे

तभा वृत्तसेवा
कंधार, ८ ऑगस्ट -

कंधार तालुक्यातील मौजे मंगलसांगवी येथे लोहा-कंधार मतदार संघाची लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या निधीतून महादेव मंदिर सभागृहाचे लोकार्पण काल दि. ०७ ऑगस्ट रोजी शेकापच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ .आशाताई श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी सर्वप्रथम आशाताई शिंदे यांनी शि.भ.प. शिवानंद महाराज दापशेडकर यांच्या कीर्तनास उपस्थित राहून शिवानंद महाराज दापशेडकर यांचा आशीर्वाद घेतला, यावेळी बोलताना आशाताई शिंदे म्हणाल्या की, लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी मतदारसंघातील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली अनेक कामे व नवीन विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मंत्रालय स्तरावरून मंजूर करून आणून मतदारसंघाचा कायापालट केला आहे ,जवळपास गेल्या अनेक वर्षापासून ही विकास कामे प्रलंबित होती, हीच कामे आमदार शिंदे यांनी पाच वर्षाच्या काळात पूर्ण केलेली असून लोहा-कंधार मतदारसंघाला सुजलाम सुफलाम करून मतदारसंघात हरितक्रांती करण्याचा मानस आमदार शिंदे यांचा असून मतदारसंघाला मराठवाड्यात लोहा कंधार मतदारसंघ एक आदर्श विकासाभिमुख मॉडेल मतदारसंघ बनवण्याचे आमदार श्यामसुंदर शिंदे व माझे स्वप्न असून हे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्यासाठी आमदार शिंदे साहेब व मी सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही यावेळी आशाताई शिंदे यांनी बोलताना दिली, यावेळी गावकऱ्यांच्या वतीने आशाताई शिंदे यांचा भव्य फटाक्याची आतिषबाजी करून व शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन भव्य सत्कार करण्यात आला, यावेळी कंधार बाजार समितीचे संचालक रोहित पाटील शिंदे, शेकापचे जिल्हाध्यक्ष बालाजी ईसादकर ,ओमराजे शिंदे, नारायण सावकार कुंभारे, दत्ता कौशल्ये ,डिके कांबळे ,प्रदीप हुंबाड,नागोराव कदम, व्यंकटराव कौशल्ये ,विशाल कौशल्ये ,गंगाधर पवळे, शिवराज शिंदे सह महादेव मंदिर समितीचे अध्यक्ष संतुकराव मुपडे सह कार्यकर्ते, पदाधिकारी, गावकरी, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री वयोश्री योजना लाभार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा
नांदेड, ८ ऑगस्ट -

राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमान परत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/ उपकरणे उदा : चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हिल चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इत्यादी. खरेदी करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु केली आहे. पात्र रक्कम ३ हजार रुपये पर्यंतची रक्कम साहित्य खरेदीसाठी महाडिबीटीद्वारे त्यांचे बँक खात्यात रक्कम जमा करण्यात येणार आहे. लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड येथे अर्ज सादर करावेत.

महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा हदगावच्या व्यवस्थापकाकडुन शेतकऱ्याची अवहेलना

तभा वृत्तसेवा
निवघा बाजार, ८ ऑगस्ट -

हदगाव शहरातील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा हदगावचे व्यवस्थापकाकडून ग्राहक व शेतकऱ्या सोबत अरेरावी धोरण राबवून शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक देऊन त्यांची अव्हेलंना केल्या जात असल्याचा आणखी एक प्रकार समोर आला आहे.

तालुक्यातील मयत शेतकऱ्याच्या नातेवाईकांने पिककर्ज परतफेड करण्याविषयी माहिती विचारली असता इतर काम करत असल्याचे नाटक करत त्याला जाणीवपूर्वक माहिती देण्याची टाळाटाळ करून अपमानित केले असल्याचा आरोप मयत शेतकऱ्याच्या नातेवाईकांने केला आहे.

राज्य सरकारकडुन राज्यातील शेतकऱ्याची कर्जमाफी करण्याच्या हालचालीना वेग आला असुन हदगावच्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या व्यवस्थापका कडून मात्र सदर बँकेचे खातेदार असलेल्या मयत शेतकऱ्याचे कर्ज फेडणे विषयी माहिती विचारण्यास गेलेल्या शेतकऱ्याच्या नातेवाईकला कुठलीही माहिती न देता अरेरावीची भाषा वापरत अपमानित केले आहे

मयत शेतकऱ्याचे नातेवाईक पिक कर्जफेडीची रीतसर माहिती विचारण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेत गेले असता हा प्रकार घडला त्याअनुषंगाने याबाबत शेतकऱ्याने त्यांचे नातेवाईकांना बँकेत बोलावले असता, बँकेचे व्यवस्थापक यांनी सुरळीत उत्तर न देता किंबहुना तोंडी तक्रारीचे कोणतेही निवारण न करता इतर काम करत असल्याचे नाटक करत त्यांचेशी हुज्जत घालत अरेरावी करीत अवहेलना केली असल्याचा आरोप मयत शेतकऱ्यांच्या नातेवाईकांनी केला आहे. या संबंधी महाराष्ट्र ग्रामीण शाखा हादगाव च्या व्यवस्थापकाची तक्रार वरिष्ठांकडे करनार असल्याचे सांगितले आहे.

सदर महाराष्ट्र ग्रामीण हदगाव बँकेच्या शाखा व्यवस्थापकाकडून दिवसेंदिवस शेतकऱ्यांची अव्हेलना व अपमान होतांना दिसत आहे याआगोदरही या बँकेत असे अनेक प्रकार घडले असल्यामुळे .संबंधित शाखा व्यवस्थापकावर वरिष्ठांनी कारवाई करण्याची मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांकडुन होत आहे.

उमरीतील मुख्य रस्ता दुरुस्त करा... अन्यथा उपोषण

तभा वृत्तसेवा
उमरी, ८ ऑगस्ट -

उमरी नगर परिषद हद्दीतील बहुतांश रस्ते खड्डेमय झाले असून पाऊसाळ्यात ते खड्डे न ओळखता आल्यामुळे अनेकदा अपघात सदृश्य परिस्थिती निर्माण होते आहे उमरी नगर परिषद प्रशासनाने वेळीच लक्ष देवून शहरातील खड्डेमय रस्ते दुरुस्त करावे अशी मागणीचे निवेदन माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी मुख्यधिकारी उमरी यांना दिले आहे.

भोकर रोडवरील रेल्वेगेट ते कै. गिरीश भाऊ गोरठेकर सांस्कृतिक सभागृह ह्या रस्त्यावर रापतवारनगर, श्री. महादेव मंदीर, नविन बसस्थानक, सांस्कृतिक सभागृह येतात त्या भागात बाजारपेठ आहे. तो संपूर्ण रस्ता वर्दळीचा असून खड्डेमय झाला आहे. नगर परिषद प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष झाले असून.

देगलूर - बिलोली मतदारसंघातून आपल्याला कामाला लागा असे आदेश : कांबळे

तभा वृत्तसेवा
देगलूर, ८ ऑगस्ट -

आगामी ९०-देगलूर-बिलोली विधानसभा निवडणुकीत आपण देगलूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी आपण पक्ष नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या असून महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आपल्याला कामाला लागा असे आदेश दिल्याचे निवृत्त अप्पर जिल्हाधिकारी बी. एम. कांबळे यांनी देगलूर येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

आक्टोबर महिन्यात राज्यात विधानसभेच्या निवडणुका होणार असून काँग्रेस व भाजप या प्रमुख पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी अनेक इच्छुक उमेदवार आपल्या नेत्यांना भेटत आहेत. देगलूर विधानसभा मतदारसंघ काही अपवाद वगळता सतत काँग्रेसपक्षाच्याच पाठिशी राहिला आहे.

महाविकास आघाडीत हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाच्या वाट्याला असून या पक्षाकडून आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी अनेकजण पक्षपातळीवर प्रयत्न करित असून निवृत्त अप्पर जिल्हाधिकारी बी. एम. कांबळे हे मागील दोन महिन्यापासून मतदारसंघातील मतदारांच्या भेटीगाठी घेत आहेत. देगलूर विधानसभेच्या पोटनिवडणुकीत ते इच्छुक उमेदवार होते मात्र त्यांना त्यावेळी काँग्रेस पक्षाकडून सबूरी राखण्याचा सल्ला देण्यात आला होता. मात्र मागील काही महिन्यात राज्याच्या राजकारणात तसेच मतदारसंघातील राजकीय बदल झाल्याने या वेळेस विद्यमान आमदारांना डावलून नवखा उमेदवार काँग्रेस पक्षाकडून उतरविला जाणार आहे. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण येथेच झाल्याने बी. एम. कांबळे यांना हा मतदारसंघ नवखा नाही. प्रशासकीय सेवेत असताना सुध्दा. त्यांचे कायम लक्ष देगलूरकडेच होते. कोरोना काळात सुध्दा आपण जातीने लक्ष ठेवून होतो. अनेक गरजूंना मदत देण्यासाठी आपण प्रयत्न केल्याचे बी. एम. कांबळे यांनी पत्रकारांना सांगितले. अधिकारी राहिल्याने मतदारसंघ विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी आपल्याकडे आराखडा असल्याचे ही त्यांनी सांगितले. काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह महाविकास आघाडीतील नेत्यांनी आपल्याला कामाला लागा असे आदेश दिल्याचे इच्छुक उमेदवार बी. एम. कांबळे यांनी सांगितले. आपल्याला मतदारांकडून उदंड प्रतिसाद मिळत असल्याचे ही त्यांनी सांगितले. यावेळी आरळी येथील उपसरपंच संजय नरहरे, पांडूरंग नरहरे आरळी, जनार्दन वाघमारे बिलोली, देगलूर येथील सेवानिवृत्त ज्येष्ठ विस्तार अधिकारी दयानंद सुर्यवंशी आदिसह पत्रकार बांधव उपस्थित होते.